# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक - अशोक हनवते. मो - 9421094991,7264079990








लातूर वर्ष ४ थे अंक ४२ वा शनिवार दि.१३ जुलै २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


## ‘लाडकी बहीण’ योजनेवरुन सत्ताधारी-विरोधक आमनेसामने

मुंबई : विधिमंडळाचे अधिवेशन सुरू आहे. त्यातच विधान परिषदेच्या ११ जागांसाठी मतदार झाले. अजित पवार यांनी अर्थसंकल्प सादर करताना मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना जाहीर केली. यानंतर या योजनेची नोंदणी करण्यासाठी ठिकठिकाणी मोठी गर्दी पाहायला मिळाली. या योजनेच्या अंमलबजावणीवरून विरोधक सत्ताधा–यांवर टीका करताना पाहायला मिळत आहेत. लाडकी बहीण योजनेवरून विधानसभेत भाजपा आमदार राम कदम आणि काँग्रेस आमदार नाना पटोले यांच्यात खडाजंगी झाली. मिळालेल्या माहितीनुसार, या योजनेचा अर्ज करण्यासाठी जे ऍप आणि वेबसाइट आहे, ते सतत बंद पडत असल्याने जनतेला त्रास होतो आहे असे सांगत नाना पटोले यांनी महायुती सरकारवर टीका केली. या टीकेला राम कदम यांनी उत्तर दिले. गोरगरीब महिलांना या योजनेतून दोन पैसे मिळालेले तुम्हाला बघवत नाही. महाविकास आघाडीला केवळ चांगल्या योजनांचे राजकारण करायचे आहे. गरीब महिलांना पैसे मिळत असतील तर तुमच्या पोटात काय दुखते? नाना पटोले यांना या योजनेची माहिती नाही. संपूर्ण महाराष्ट्रात ही योजना फसली



पाहिजे, असा विरोधकांचा प्रयत्न आहे, या शब्दांत राम कदम यांनी नाना पटोलेंच्या टीकेचा समाचार घेतला.

सत्ताधा–यांना राजकारण करायचे आहे राम कदम यांना उत्तर देताना नाना पटोले म्हणाले की, लाडकी बहीण योजनेला आमचा कोणताही विरोध नाही. सरकारने काय करायचे हा त्यांचा प्रश्न आहे. या योजनेचा अर्ज करण्यासाठी जे ऍप आणि वेबसाइट आहे. त्यांचा प्रॉब्लेम सुरु आहे. त्यामुळे तहसीलमध्ये रांगा लागल्या आहेत. अनेक विद्यार्थ्यांनाही याचा त्रास होतो आहे. त्यांना जात प्रमाणपत्रे आणि इतर कागदपत्रे मिळत नाही. म्हणून लाडकी बहीण योजनेच्या अंमलबजावणीवर प्रश्न उपस्थित केला, मात्र, सत्ताधा–यांना याचे केवळ राजकारण करायचे आहे, असे प्रत्युत्तर नाना पटोले यांनी दिले. राम कदमही आक्रमक नाना पटोले यांनी लाडकी बहीण योजनेवर टीका केली. नाना पटोले यांना वस्तूस्थिती माहिती नाही. घाटकोपर मतदारसंघात एका घरात तीन बहिणी आहेत. त्यांना दर महिन्याला साडेसात हजार रुपये मिळणार आहेत. काँग्रेस आणि महाविकास आघाडीचे कार्यकर्ते जाऊन त्यांचा चुकीचे अर्ज भरत आहेत. १५ ऑगस्टला आमच्या बहिणींच्या खात्यात हे पैसे जाऊ नये, असा महाविकास आघाडीचा प्रयत्न आहे, असा दावाही राम कदम यांनी केला.

## स्मृति इराणींचा अपमान करू नका : राहुल गांधी



नवी दिल्ली : लोकसभा निवडणुकीत भाजपाने ४०० पारचा नारा दिला होता. परंतु, प्रत्यक्षात भाजपाला २४० जागांवर समाधान मानावे लागले. एनडीतील घटक पक्षांच्या पाठिंब्याने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपला तिसरा कार्यकाळ सुरू केला. या निवडणुकीत अनेक दिग्गजांचा पराभव झाला. यामध्ये भाजपा नेत्या स्मृति इराणी यांचाही समावेश आहे. यातच काँग्रेस नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी सर्व काँग्रेस नेते, कार्यकर्त्यांना एक आवाहन केले आहे. मागील लोकसभा निवडणुकीत स्मृति इराणी यांनी राहुल गांधी यांचा अमेठीत पराभव केला होता. परंतु, या लोकसभा निवडणुकीत अमेठी येथे स्मृति इराणी यांचा पराभव झाला. अमेठीतून केएल शर्मा विजयी झाले. यानंतर स्मृति इराणी यांच्यावर जोरदार टीका करण्यात येत आहे. तसेच सोशल मीडियावर ट्रोल केले जात असल्याचे सांगितले जात आहे. केंद्र सरकारच्या अनेक धोरणांवर सातत्याने टीका करणाऱ्या राहुल गांधी यांनी एक्सवर एक पोस्ट करत स्मृति इराणी यांचा अपमान करू नये, असे म्हटले आहे.

## केजरीवालांना अंतरिम जामीन; मुक्काम मात्र तुरुंगातच

नवी दिल्ली : दिल्ली मद्य धोरण घोटाळ्यामध्ये ईडीकडून सुरु असलेल्या कारवाईमध्ये मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना मोठा दिलासा मिळाला आहे. कोर्टाने त्यांना अंतरिम जामीन मंजूर केला आहे. तर त्यांच्या अटकेला आव्हान देणारी याचिका मोठ्या खंडपीठाकडे पाठवण्यात आलेलं आहे. केजरीवालांना सध्या अंतरिम जामीन मिळालेला असला तरी ते जेलमधून बाहेर येऊ शकणार नाहीत. परंतु पाच दिवसांनंतर म्हणजे १७ जुलै रोजी हायकोर्टात होणाऱ्या सुनावणीच्या आधी त्यांना दिलासा मिळाला आहे. सुप्रीम कोर्टाने म्हटलं की, अरविंद केजरीवाल हे ९० दिवसांपेक्षा जास्त वेळेपासून जेलमध्ये आहेत. ते एक नवनिर्वाचित नेते आहेत आणि त्यांना पदावर रहायचं आहे की नाही, हे त्यांच्यावर अवलंबून आहे.केजरीवालांचे वकील विवेक जैन म्हणाले की, आता प्रकरण मोठ्या बेंचकडे गेलं आहे. पीएमएलए प्रकरणात केजरीवालांना अंतरिम जामीन मिळाला आहे. त्यामुळे जामिनाशी जोडलेलं प्रकरण आता संपलं आहे.



न्यायमूर्ती संजीव खन्ना आणि न्यायमूर्ती दीपांकर दत्ता यांच्या सर्वोच्च न्यायालयातील खंडपीठाने ईडीच्या अटकेविरोधातील याचिकेला लार्जच बेंचकडे पाठवलं आहे. केवळ चौकशी करुन अटक होऊ शकत नाही, असं कोर्टाने नमूद केलं आहे.

जस्टिस खन्ना म्हणाले की, मूळ अधिकारासंबंधीचं हे प्रकरण आम्ही मोठ्या खंडपीठाकडे पाठवलं हे. त्यामुळे अरिवंद केजरीवाल यांना आम्ही जामिनावर मुक्त करण्याचे निर्देश देतो. अंतरिम जामिनाच्या प्रश्नावर खंडपीठाकडून सुधारणा केली जाऊ शकते, असंही कोर्टाने स्पष्ट केलं.

कोर्टाने म्हटलं की, आम्ही जामिनाच्या मुद्दा तपासला नसून पीएमएलएच्या कलम १९च्या पॅरामीटर्सची तपासणी केली. यात अटकेच्या नियमांमध्ये आणखी स्पष्टता आवश्यक आहे. १९ हे अधिकाऱ्यांचे व्यक्तिनिष्ठ मत असले तरी ते न्यायालयाच्या पुनरावलोकनाच्या अधीन आहे.

दुसरीकडे सीबीआयने या प्रकरणात दुसरा खटला दाखल केला आहे. त्यावर १७ जुलै रोजी सुनावणी होणार आहे. तिथेही केजरीवालांना जामीन मिळेल, असं त्यांच्या वकिलांनी सांगितलं.

## गुंठेवारीच्या नावाखाली लाभार्थ्यांची लूट ; पारदर्शक तहसीलदार सौदागर तांदळे लक्ष देतील का?



लातूर / प्रतिनिधी :- जागा जमीन गुंठेवारी करून घेण्यासाठी संबंधित तलाठी, मंडळ अधिकारी, कारकून, नायब तहसीलदार, रजिस्टार, नगर रचनाकार, महावितरण,तहसीलदार यांच्या पायऱ्या चाटून पुन्हा गुंठेवारी साठी उपविभागीय कार्यालय लातूर यांच्यापर्यंत खेटा माराव्या लागतात. गुंठेवारीचा अहवाल पूर्ण असेल तर उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे तात्काळ सही करून त्या लाभार्थ्याकडे पोहोच करतात आणि या गुंठेवारी साठी जे काही खेटे- रेटे सहन करावे लागतात ते सांगण्या पलीकडे असे लोक बोलताना दिसत आहेत. प्लॉट - जागा, जमीन खरेदी विक्रीसाठी गुंठेवारीची फारच गरज असते त्यासाठी तलाठी, मंडळ अधिकारी, कारकून, महावितरण, सब रजिस्टर, नायब तहसीलदार, नगर रचनाकार,महावितरण, तहसीलदार ,उपविभागीय कार्यालय, असा खेटा- रेटा सहन करावाच लागतो पण लातूर तहसील मधीलच अनेक टेबलावर चलन भरूनही फाईली एक-दोन महिने एकाच ठिकाणी राहतात. नंतर चिरीमिरी दिल्यास थोडे पुढे सरकते फाईल पुढे फिरल्यानंतरही ती तहसीलदार यांच्या टेबलावरजातच नाही सर्व काही तहसीलदार यांना अंधारात ठेवूनच केले जाते अशा या कारभारात तहसीलदार यांची मुख संमती असते की त्यांची बदनामी व्हावी - करावी या हेतूने सगळे सोपस्कार केले जात असावे याची तहसीलदार सौदागर तांदळे यांनी दखल घ्यावी अशी मागणी होताना दिसते आहे.

## मनपा उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे कार्यक्षम अधिकारी !



लातूर / प्रतिनिधी :- शासकीय सेवेतील अधिकारी येतात बदली मुळे जातात परंतु काही अधिकारी त्यांच्या कार्याचा ठसा साठवून मागे ठेवून जातात पण ते बदलून जाण्यापूर्वीच त्यांच्या कार्याची लातूर शहर मनपा वर्तुळात आम जनतेत एक कार्यक्षम - तत्पर अधिकारी म्हणून सध्या चर्चा होते आहे ते लातूर शहर महापालिकेचे उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसो ळे हेच होत. लातूर शहर महानगरपालिकेच्या आजवरच्या इतिहासात मालमत्ता कर, मनपा गाळे भाडे वसुली करण्याचा डॉ. खानसोळे यांनी केलेला विक्रम महत्त्वाचा ठरतो. रस्त्यावरील अनधिकृत होर्डिंग्ज, युनिकपोल वरील जाहिराती हटविणे दंडात्मक कर वसूल करणे हे मनपा उपायुक्त डॉक्टर पंजाबराव खांजोळे यांची महत्त्वाची असून त्यात कमी जास्त वसुली करणे कोणास सवलत देणे किंवा कोणाकडे कानाडोळा करणे ही प्रक्रिया कोणाही अधिकाऱ्यास करावेच लागते पण कार्यक्षम- तत्पर सेवा देणारे अधिकारी म्हणून लातूर मनपा उपायुक्त डॉ.पंजाबराव खानसोळे हे कौतुकास पात्र ठरतात अशी मनपा वर्तुळात चर्चा होताना दिसते आहे.

## लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने मुख्यमंत्री -माझी लाडकी बहीण योजनेचे अर्ज स्वीकृती केंद्र सुरु शहरातील महिलांनी लाभ घ्यावा - आयुक्त बाबासाहेब मनोहरे

लातूर/प्रतिनिधी : - लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने मुख्यमंत्री -माझी लाडकी बहीण योजनेचे अर्ज स्वीकृती केंद्र सुरू शहरातील महिलांनी लाभ घ्यावा असे आव्हान लातूर शहर महापालिकेचे आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी केले आहे. शासनाच्या वतीने राज्यातील महिलांचे आरोग्य व पोषण आणि यांच्या आर्थिक स्वावलंबनासाठी विविध योजना राबविण्यात येत आहेत. त्यानुसार राज्यातील महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी, त्यांच्या आरोग्य आणि पोषणामध्ये सुधारणा करणे आणि कुटुंबातील त्यांची निर्णायक भूमिका मजबूत करण्यासाठी शासनामार्फत मुख्यमंत्री - माझी लाडकी बहीण योजना सुरू करण्यात आलेली आहे. या योजनेचा लाभ शहरातील पुढीलप्रमाणे पात्रता निकष पूर्ण करणाऱ्या महिलांना अर्ज करता येतो. यात महाराष्ट्र राज्यातील २१ ते ६५ वर्षे वयोगटातील विवाहित, विधवा, घटस्फोटीत, परित्यक्त्या आणि निराधार महिला तसेच त्या कुटुंबातील केवळ एक अविवाहित मुलगी, यासाठी त्या महिलेचे आधार कार्ड, महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र आवश्यक आहे ते नसल्यास त्या ऐवजी त्या महिलेचे १५ वर्षापूर्वीचे रेशन कार्ड, मतदान ओळखपत्र, शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र व जन्म दाखला या पैकी कोणतेही एक कागदपत्र, उत्पन्न प्रमाणपत्र किंवा रेशन कार्ड, बँक खातेचे पास बुक व एक पासपोर्ट फोटो अर्ज भरण्यासाठी आवश्यक आहेत. ज्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न २ लक्ष ५० हजार पेक्षा जास्त आहे अशा कुटुंबातील महिला पात्र असणार नाहीत. योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महानगरपालिका क्षेत्रात अर्ज स्वीकृती केंद्र स्थापन करण्यात आली आहेत या केंद्रावर कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. त्याची यादी पुढीलप्रमाणे शहरातील क्षेत्रीय कार्यालय ए मध्ये काशी महादेव मंदिर विशालनगर, मारोती मंदिर सूळ नगर, नागरी आरोग्य केंद्र सुभेदार रामजी नगर, पाण्याची टाकी बार्शी रोड, बौद्धविहार विक्रमनगर, बालाजी मंदिर हडको कॉलनी, मनपा शाळा क्र. २४ विकास नगर, बौद्धविहार न्यू भाग्य नगर, कुलस्वामिनी मंदिर कुलस्वामिनी नगर, नालंदा बौद्धविहार प्रकाश नगर, वाले इंग्लिश स्कूल खाडगाव रोड, मनपा मंगल कार्यालय खणी भाग, पाण्याची टाकी सरस्वती कॉलनी, राधा कृष्ण मंदिर दादोजी कोंडदेव नगर, क्षेत्रीय कार्यालय बी मध्ये दक्षिणमुखी हनुमान मंदिर लमाण तांडा, क्षेत्रीय कार्यालय बी ठाकरे चौक, विठ्ठल रुक्मिणी मंदिर कन्हेरी रोड, लाल बहादूर शाळा जुना औसा रोड, श्री श्री रविशंकर शाळा गोपाळ नगर, राजनंदिनी शाळा गोपाळ नगर, विठ्ठल रुक्मिणी मंदिर माताजी नगर, राम मंदिर पटेलनगर, मिनार उर्दू स्कूल हनुमान मंदिर नंदनवन कॉलनी, विठ्ठल रुक्मिणी मंदिर मजगे नगर, क्षेत्रीय कार्यालय सी मध्ये सिद्धार्थ समाजमंदिर संजयनगर, साहित्य सम्राट अण्णा भाऊ साठे सभागृह राजीवनगर, बौद्धविहार समाजमंदिर इंदिरानगर, बौद्धविहार आनंदनगर, भोई



समाजमंदिर तुळजाभवानी नगर, प्रियदर्शिनी समाजमंदिर लेबर कॉलनी, समाजमंदिर सम्नाट चौक, समाजमंदिर संजयनगर, समाजमंदिर संत गोरोबा सोसायटी, मनपा शाळा जुनी यशवंत शाळा साळे गल्ली, मनपा शाळा क्र. ९ मंठाळे नगर, मनपा शाळा क्र. ३ बादाडे नगर, मनपा शाळा क्र.३ सोफिया मस्जिद, मनपा शाळा क्र. २६ मिलिंद शाळेजवळ, मनपा शाळा क्र. ५ आनंदनगर, मनपा शाळा क्र. ५ राजीव नगर, क्षेत्रीय कार्यालय सी, क्षेत्रीय कार्यालय डी मध्ये चर्मकार समाजमंदिर साळे गल्ली, ढोर समाजमंदिर सिद्धेश्वर चौक, अण्णा भाऊ साठे समाजमंदिर विलासनगर, काशीनाथ समाजमंदिर वैदू वस्ती, रमाबाई माता समाजमंदिर रमाबाई नगर, यशवंत शाळा नांदेड रोड, पूर्णानंद मंगल कार्यालय खोरी गल्ली, मनपा शाळा क्र. २८ केशवनगर, मनपा शाळा क्र. ३२ बरकत नगर, भदंत महाथेरो चंद्रमुनी बौद्धविहार गवळीनगर, शहरातील सर्व नागरी आरोग्य केंद्र, मनपा ऊ-ध-छ्णडच् शहर अभियान व्यवस्थापन कक्ष रूम नंबर ११ या ठिकाणी करण्यात आली आहे. तरी शहरातील जास्तीत जास्त पात्र महिलांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन महानगरपालिका आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी केले आहे.

## २५ जून ‘संविधान हत्या दिवस’ म्हणून पाळला जाणार



नवी दिल्ली : यावर्षी झालेल्या लोकसभा निवडणुकीमध्ये संविधान हा प्रचाराचा मोठा मुद्दा बनला होता. तसेच ४०० जागा आल्यास मोदी आणि भाजपा संविधान बदलतील, या विरोधकांनी केलेल्या प्रचारामुळे भाजपाचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं होतं. तसेच सरकार स्थापन झाल्यानंतर झालेल्या पहिल्याच अधिवेशनामध्ये विरोधी पक्षांच्या खासदारांनी हातात संविधानाच्या प्रती घेऊन शपथ घेतली होती.त्यानंतर विरोधकांना प्रत्युत्तर म्हणून सरकारने आणीबाणीचा निषेध करणारा प्रस्ताव लोकसभेत आणला होता. आता संविधानाच्या मुद्द्यावरून काँग्रेसला धक्का देण्यासाठी केंद्र सरकारने मोठी खेळी केली असून, आणीबाणीची घोषणा झालेला २५ जून हा संविधान हत्या दिवस म्हणून पाळण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. आता दरवर्षी २५ जून रोजी संविधान हत्या दिवस पाळला जाईल, असे अमित शाह यांनी याबाबतची घोषणा करताना सांगितले. याबाबत घोषणा करताना केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी सांगितले की, २५ जून रोजी १९७५ रोजी तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी आपल्या हुकूमशाही प्रवृत्तीचं दर्शन घडवताना भारतीय लोकशाहीचा गळा आवळला होता. लाखो लोकांना विनाकारण तुरुंगात टाकण्यात आलं होतं. तसेच प्रसारमाध्यमांचाही आवाज दाबण्यात आला होता. आता भारत सरकारवने २५ जून हा दिवस संविधान हत्या दिवस म्हणून पाळण्याचा निर्णय घेतला आहे. या दिवशी १९७५ च्या आणीबाणीच्या काळात ज्या लोकांनी यातना भोगल्या, त्याचं स्मरण केलं जाईल. अमित शाह यांनी पुढे सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकारला त्या लोकांचा सन्मान करायचा आहे ज्यांनी हुकूमशाह सरकारकडून देण्यात आलेल्या असंख्य यातनांचा सामना करून लोकशाहीच्या पुनरुज्जीवनासाठी संघर्ष केला. संविधान हत्या दिवस हा काँग्रेससारख्या कुठल्याही हुकूमशाही मानसिकतेला भविष्यात याची पुनरावृत्ती करता येऊ नये म्हणून, प्रत्येक भारतीयाच्या मनात लोकशाहीचं रक्षण आणि व्यक्तिगत स्वातंत्र्याच्या अमर ज्योतीला जिवंत ठेवण्याचं काम करेल, असेही अमित शाह यांनी सांगितले.

## संपादकीय....

# बेबंदशाहीचे 'पूजा'पाठ!

शैक्षणिक व्यवस्थेचे मातेरे करून, अभियांत्रिकी, वैद्याकीय शाखांचा खेळखंडोबा करून आता आपण केंद्रीय लोकसेवा परीक्षांमध्ये दिवे लावायला सुरुवात केली आहे. स्पर्धा परीक्षांवर सर्व लक्ष केंद्रित करणारे या देशातील बुद्धिमान, कष्टकरी इत्यादी इत्यादी विद्यार्थी आणि त्यांच्या यशाच्या स्वप्नरंजनात मशगूल पालक या उभयतांनी पूजा खेडकर यांचे शतश: आभार मानायला हवेत. यश मिळविण्यासाठी अभेद्या, दुष्प्राप्य वगैरे समजल्या जाणाऱ्या या परीक्षांच्या आणि नंतरच्या अधिकारी निवड प्रक्रियेचा बुरखा या पूजाबाईंनी टराटरा फाडला असून त्यांच्या या एकहाती कर्तबगारीची नोंद देशाच्या प्रशासकीय इतिहासात सुवर्णाक्षरांत केली जाईल, यात तिळमात्रही शंका नाही. एखादी व्यक्ती व्यवस्था, नीती-नियम आदींस खुंटीवर टांगून पोलादी परीक्षा यंत्रणेचा लौकिक कसा मातीमोल करू शकते आणि असे करून मजबूत मानली जाणारी यंत्रणा किती कचकड्याची आहे हे दाखवून देऊ शकते याचे या पूजाबाईंइतके उत्तम उदाहरण शोधूनही सापडणार नाही. अर्थात त्यांच्या या अभूतपूर्व यशामागे बुद्धिमान, प्रामाणिक कष्ट केल्याशिवाय यश मिळत नाही अशी वदंता असणाऱ्या परीक्षांचे पार मातेरे करण्यात समाज म्हणून आपल्या निष्क्रिय सहभागाचा वाटा आहे हे नाकारता येणार नाही, हे खरे. अलीकडेच आपण वैद्याकीय अभ्यासक्रमासाठी अत्यंत चुरशीच्या मानल्या जाणाऱ्या 'नीट' परीक्षांचे उत्तम वाटोळे केले. ते पूर्ण व्हायच्या आत या पूजाबाईंच्या सौजन्यामुळे स्पर्धा परीक्षांचा क्रम लागला. आयएएस, आयपीएस, आयएफएस इत्यादी परीक्षांत यशस्वी होणे या देशातल्या प्रत्येक तरुण-तरुणीचे स्वप्न असते आणि त्या स्वप्नपूर्तीसाठी शिक्षणाच्या बाजारपेठा दुथडी भरून वाहत असतात. या परीक्षांत यशस्वी होण्यासाठी किती कष्ट करावे लागतात, दिवसाचे २०-२० तास अभ्यास करावा लागतो, मुलाखतीचे तंत्र आत्मसात करावे लागते, सामान्यज्ञान उत्तम असावे लागते, चतुरस्त्रा व्यक्तिमत्त्व विकासाचा ध्यास असावा लागतो इत्यादी इत्यादी कथाकहाण्यांनी घरोघरीचे शैक्षणिक वातावरण भारलेले असते. तथापि या परीक्षा, त्यांची निवड पद्धती प्रत्यक्षात कोणत्याही ग्रामसिंह शिक्षणसम्राटाच्या संस्थेतील प्रवेश प्रक्रियेप्रमाणे 'मॅनेज' करता येऊ शकते किंवा काय असा प्रश्न या पूजनीय पूजाबाईंची कृती दर्शवते. त्यांच्या या कर्तृत्वासाठी स्पर्धा परीक्षांसाठी रक्त आटवणाऱ्यांच्या पिढ्यानपिढ्या त्यांच्या ऋणात राहतील. याचे कारण इतके दिवस प्रशासकीय अधिकाऱ्यांची प्रशिक्षण अकादमी ही फक्त उच्च दर्जाची वधू-वर संस्था आहे असे मानले जात होते. देशातील अनेक पॉवरफुल अधिकाऱ्यांच्या पॉवरफुल जोड्यांच्या गाठी स्वर्गात नव्हे तर मसुरीच्या या प्रशिक्षण अकादमीत बांधल्या जातात, हे अनेक जण जाणून होते. त्यामुळे पती कलेक्टर तर पत्नी सीईओ, हा गृहसचिव तर ती महसूल खात्यात, ती आयकर खात्यात तर तो अबकारीत इत्यादी अनेक सरकारी मेहुण हा देश पाहात आलेला आहे. आपल्या सुविद्या श्वानाच्या फेरफटक्यात व्यत्यय नको म्हणून आयएएस अधिकारी जोडपे स्टेडियमवर खेळाडूंनाच प्रवेशबंदी कशी करू शकते हे आपण पाहिलेले आहे. आपल्या (अर्थातच प्रिय) पत्नीच्या प्रभात आणि सायंकालीन फेरफटक्यात अन्य कोणाची बाधा नको म्हणून पटांगणावर सामान्यांसाठी निर्बंध आणणारा कर्तव्यदक्ष आयएएस अधिकारी महाराष्ट्रानेही याचि देही बघितलेला आहे. सेवाकाळात संधान बांधून निवृत्त झाल्या झाल्या उद्याोग समूहास 'दुनिया मुट्ठी मे' घेण्यात कायावाचामनोभावे साथ देणारे आयएएस अधिकारी तर डझनांनी सापडतील. निवृत्त झाल्या झाल्या राजकीय पक्षांत सहभागी होऊन थेट निवडणुकांच्या राजकारणात उतरणारे, निवृत्योत्तर पदांची बेगमी सेवाकाळात करणारे वगैरे तर किती दाखवावेत! सत्ताधाऱ्यांच्या वळचणीस राहून त्यांच्यावर होणाऱ्या सत्तासंपत्ती वर्षावाचे चार तुषार आपल्याही अंगावर कसे उडतील याची खबरदारी घेणारे इत्यादींची तर गणतीच नाही. पण एक प्रशिक्षणार्थी पूजा निपजते आणि या सर्वांपेक्षा आपण किती सरस हे दाखवून देते ही बाब कौतुकास्पदच! आधीच्या पिढीचे कर्तृत्व पुढची पिढी आणखी पुढे नेते ते असे. यावरून काही मुद्दे सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट होतात. जसे की आपल्या शैक्षणिक व्यवस्थेचे झाले आहे तितक्या मातेऱ्यावर आपण समाधानी नाही. पहिली ते दहावी, बीए, बीएस्सी, बीकॉम वगैरे पदवीधारी पण प्रत्यक्षात अक्षरओळखी बुद्धिमत्तेच्या पिढ्यानपिढ्या प्रसवल्यानंतर आपण आपल्या अभियांत्रिकीचा खेळखंडोबा केला. टुकार दर्जाचे इतके अभियंते आपण निर्माण केले की त्यांच्या कौशल्यापेक्षा 'आयटीआय' प्रमाणपत्रधारी अधिक उपयुक्त आणि गुणवंत ठरू लागले. अशा तऱ्हेने अभियांत्रिकीचे दिवाळे निघाल्याची खात्री झाल्यावर आता क्रम वैद्याकीय शाखेसाठी आवश्यक 'नीट' परीक्षांचा. याबाबतही तसा महाराष्ट्र आघाडीवर. ऐन निवडणुकांच्या तोंडावर राजकीय सोयीसाठी नवे आरक्षण धोरण आणून काही वैद्याकीय शाखांत खुल्या प्रवर्गात एकही प्रवेश मिळू न देण्याची व्यवस्था महाराष्ट्राने २०१९ सालीच करून दाखवली. त्यानंतर पावित्र्य राखून होत्या दोनच विद्याशाखा. 'आयआयटी'चे अभ्यासक्रम आणि केंद्रीय लोकसेवा आयोगातर्फे घेण्यात येणाऱ्या आयएएस वगैरेसाठींच्या परीक्षा. त्याच्याआधीच्या राज्य लोकसेवा आयोग परीक्षांची माती आपण यशस्वीपणे केलेली आहेच. यातही महाराष्ट्राचा दबदबा मोठा. परीक्षांपाठोपाठ परीक्षांचे पेपर कसे फोडता येतात, हे या राज्याने दाखवून दिले. असे होत असताना केंद्रीय लोकसेवा परीक्षांचा लौकिक तसा टिकून होता. या परीक्षांतील यशस्वी सेवेत आले की उत्तरायुष्यात किती तेजस्वी दिवे लावतात हे सर्वांस ठाऊक होतेच.

# असत्याची फॅक्टरी बंद पडो सगळ्यांचीच!



वादांचा केवळ राजकीय खेळ होऊ नये भोवतालची परिस्थिती नागरिकही पाहताहेत, हे राजकारण्यांनी लक्षात घ्यावं, यासाठी हा पत्रलेख 'लोकसत्ता'मध्ये 'पहिली बाजू' सदरात 'असत्याची फॅक्टरी बंद पडेल' हा भाजप प्रवक्ते केशव उपाध्ये यांचा लेख (९ जुलै) आणि त्याचा प्रतिवाद करणारा, काँग्रेस प्रवक्ते धनंजय जुन्नरकर यांचा लेख (१० जुलै) प्रकाशित झाला. दोन्ही राजकीय बाजूंनी आपलं म्हणणं मांडल्यानंतर सत्य-असत्य आणि राजकारण याबद्दल पुन्हा काही म्हणावंसं वाटतं. वास्तविक हे म्हणताना नागरिक म्हणून माझ्या स्थानावरून मला जे दिसलं आहे ते स्पष्टपणे मांडलं तर त्याला पक्षीय/ राजकीय लेबल लागू नये; पण ते कदाचित लागू शकेल. याचं कारण असं की 'असत्यकथना'च्या किंवा जुन्नरकर यांनी लेखात म्हटल्याप्रमाणे 'कथानकवादी राजकारणा'च्या संदर्भात पाहिलं तर भाजप अनेक योजने पुढे आहे हे उघड गुपित असल्यासारखं आहे आणि त्याचा उच्चार केला तर तुम्हाला नागरिक न म्हणता राजकीय म्हटलं जाऊ शकतं. (ही आजची आपली 'वैचारिक शोकांतिका' आहे!). केशव उपाध्ये यांनी त्यांच्या लेखात राहुल गांधी लोकसभेत खोटं बोलले असा आरोप केला आहे. 'लोकसभा निवडणुकीच्या प्रचारात मुस्लिमांना देशातून बाहेर काढणार, दलित-आदिवासींचे आरक्षण रद्द करणार, संविधान बदलणार यांसारख्या अनेक खोट्यानाट्या गोष्टी पसरवून काँग्रेस आणि इंडिया आघाडीने सत्तेसाठी आपण कोणत्या थराला जाऊ शकतो, याची प्रचीती दिली' असंही त्यांनी लिहिलं आहे. भाजपचे प्रवक्ते म्हणून उपाध्ये विरोधी पक्षावर हल्ला चढवणार हे उघडच आहे. राजकीय पक्षांनी एकमेकांवर केलेल्या आरोपांमधील तथ्य शोधून सत्य बाहेर काढणं हा एक वेगळा, अभ्यासाचा विषय आहे. स्वतंत्र (राहिलेली) माध्यमे आणि जबाबदार, जाणकार नागरिक यांनीच ते करावं अशी स्थिती आहे. पण माझ्यासारखा मनुष्य जेव्हा त्याच्या 'नागरिक' या स्थानावरून राजकारणाच्या पटावरील घडामोडी पाहतो तेव्हा त्याला काही गोष्टी दिसतात आणि त्या अधोरेखित कराव्याशा वाटतात. असत्यकथन हा मुद्दा घेतला तर मला भाजपच्या अनेक गोष्टी दिसतात. 'काँग्रेस तुमच्या गळ्यातील मंगळसूत्र काढून घेईल आणि ते घुसखोरांना देईल' असं विधान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं होतं. त्यांनी मुसलमान हा शब्द वापरला नव्हता तर घुसखोर हा शब्द वापरला होता. आणि हे बोलण्याआधी त्यांनी काँग्रेस सगळं मुस्लिमांना देऊ इच्छिते अशा आशयाचं विधान केलं होतं. आता हे विधान असत्य नाही आणि निवडणूक प्रचाराचा भाग म्हणून ते बरोबरच आहे असं कदाचित उपाध्ये म्हणतील. कारण अर्थातच ते मोदींनी केलेलं आहे. लोकसभा निवडणूक होण्याआधी सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त सरन्यायाधीश मदन लोकूर, उच्च न्यायालयाचे निवृत्त सरन्यायाधीश ए. पी. शहा आणि वरिष्ठ पत्रकार एन. राम यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राहुल गांधी या दोघांना खुल्या चर्चेचं आमंत्रण दिलं होतं. राहुल गांधींकडून हे आमंत्रण स्वीकारल्याचं पत्र दिलं होतं. पण नरेंद्र मोदींनी आमंत्रणाला उत्तर दिलं नाही. संसदेच्या अधिवेशनात राहुल गांधींनी 'नीट' परीक्षेबाबत संसदेत चर्चा व्हावी यासाठी नरेंद्र मोदींना पत्र लिहिलं होतं. पण तशी चर्चा झाली नाही. संसदेत राहुल गांधींचं जे भाषण गाजलं त्यात कुठेही 'हिंदू हिंसक आहेत' असं म्हटलेलं नव्हतं. हिंदू धर्म अहिंसा शिकवतो हे सांगून, आजच्या राजकारणाबद्दल 'जे लोक स्वत:ला हिंदू म्हणवताहेत ते २४ तास हिंसा आणि द्वेष पसरवताहेत' असं भाजपला उद्देशून म्हटलं गेलं. या विधानानंतर मात्र नरेंद्र मोदी लगेच उठून उभे राहिले आणि 'हा अत्यंत गंभीर विषय आहे. संपूर्ण हिंदू समाजाला हिंसक म्हणणं गंभीर आहे' असं म्हणाले. वास्तविक त्यांना 'भाजप हिंसा-द्वेष पसरवतो हे सिद्ध करून दाखवा' असं म्हणता आलं असतं. पण ते तसं म्हणाले नाहीत. त्यानंतर भाजपने गुजरातमधील काँग्रेसच्या कार्यालयावर हल्ला केला. शिवाय राहुल गांधींबाबत तो हिंदूविरोधी आहे म्हणून समाजमाध्यमांमधून आणि इतरत्र जोरदार प्रचार सुरू झाला. समोरासमोर चर्चेला किंवा कुठल्याही चर्चेला कायम नकार द्यायचा आणि जे बोललं गेलेलंच नाही ते बोलल्याचं बिनदिक्कतपणे सांगत वातावरण पेटवून द्यायचं हे किमान पंतप्रधानांनी तरी करू नये असं म्हणता आलं असतं; पण तसं म्हणता येत नाही हे पुरेसं बोलकं आहे. भाजपने ज्याचं नाव घेत धार्मिक राजकारण केलं तो श्रीराम हा सत्यवचनी म्हणून ओळखला जातो. श्रीरामाच्या या गुणाच्या पार्श्वभूमीवर भाजपने आयटी सेल स्थापन करून गेली काही वर्षं असत्याचा सतत प्रचार करणं केशव उपाध्ये यांना कसं वाटतं हेही समजून घेणं आवश्यक ठरेल. 'हम जो चाहे वो संदेश जनता तक पहुंचा सकते हैं। चाहे खट्टा हो या मीठा हो, सच्चा हो या झूठा हो। ये काम हम कर सकते है, मगर वो इसलिये हो पाया क्योंकि हम ३२ लाख (लोगों) के व्हॉट्सअॅप ग्रूप बना के खड़े थे।' हे विधान अन्य कुणाचं नसून अमित शहा यांचं आहे. २०१८ साली अमित शहा यांनी हे विधान कोटा, राजस्थान इथल्या भाजपच्या सोशल मीडिया कार्यकर्त्यांसमोर बोलताना केलं होतं. त्यांच्या भाषणाचा व्हिडीओ आजही उपलब्ध आहे. त्याच वर्षी १७ जून २०१८ रोजी शिवम शंकर सिंग या भाजप आयटी सेलमध्ये राम माधव यांच्यासह काम करणाऱ्या कार्यकर्त्याने 'मी भाजप का सोडतो आहे?' या शीर्षकाची एक पोस्ट 'मीडियन' या संकेतस्थळावर लिहिली होती. त्यात त्यानं भाजपचं मूल्यमापन 'गुड, बॅड, अग्ली' अशा तीन भागांत केलं होतं. मी भाजप सोडतो आहे याचं मुख्य कारण भाजपतर्फे पसरवले जाणारे खोटे मेसेजेस हे आहे असं त्यानं म्हटलं होतं. अर्थात, अटलबिहारी वाजपेयींनंतरच्या भाजपचं स्वरूप पुरतं बदललेलं आहे. पंतप्रधान म्हणून नरेंद्र मोदी यांच्यावर जे आक्षेप आहेत तेही अनेकदा मांडले गेलेले आहेत. ते स्वत: अनेकदा त्यांच्या भाषणांमधून खरं बोललेले नाहीत, याचा तपशील माध्यमांमध्ये उपलब्ध आहे. समाजमाध्यमांचा जोरकस वापर भाजपने प्रथम सुरू केला हे खरं; पण नंतर इतरही पक्षांनी सुरू केला. त्यांच्याकडूनही फेक न्यूज पसरवल्या गेल्याची शक्यता आहेच. भाजप समर्थक आणि विरोधक यांच्या द्वंद्वात 'भाजप आणि एकूण हिंदुत्ववादी संघटना इतका द्वेष पसरवतात तर आपल्याकडून काही वेळा प्रखर उत्तर दिलं गेलं तर ते मनावर घ्यायचं कारण नाही' असा बचाव विरोधकांकडून येत असतो. भाजपने पद्धतशीरपणे, सातत्याने समाजमाध्यमांचा वापर द्वेष पसरवण्यासाठी केला - मुख्य म्हणजे समाजमाध्यमं नव्हती तेव्हाही उजव्या विचारसरणीने हे केलं होतं. समाजमाध्यमांचा दुरुपयोग तुरळक प्रमाणात होणं आणि 'तसा दुरुपयोग करत राहणं हेच तुमचं चरित्र असणं' यात फरक आहे. योग्य माहितीच्या अभावी, हेतूत दुष्टावा नसताना काही असत्य बोललं जाणं आणि हेतुपूर्वक असत्य बोलत राहणं यातही फरक आहे. पण हा बारकावा अर्थातच भाजप किंवा भाजप समर्थक लक्षात घेणार नाहीत. दिसत असूनही ते तिकडे दुर्लक्षच करतील. आता इथे असा प्रश्न येईल की भाजपची 'असत्याची फॅक्टरी' राजरोसपणे अनेक वर्षं सुरू आहे म्हणून मग काँग्रेसकडून किंवा अन्य भाजपविरोधी पक्षांकडून कधी असत्यकथन झालं तर ते क्षम्य मानायचं का? तर अर्थातच नाही! आजच्या काळाची शोकांतिकाच ही आहे की योग्य-अयोग्य, चांगलं-वाईटच्या व्याख्या सापेक्ष झाल्या आहेत. असत्य जर आपला पक्ष, आपला नेता बोलत असेल तर ते क्षम्य मानून त्याला 'राजकारणात तेवढं चालतंच' या श्रेणीत बसवलं जातं आणि तेच जर विरोधी पक्ष, विरोधी नेता बोलत असेल तर त्यावर आक्रोश केला जातो. असत्य आणि राजकारण यांचा परस्परसंबंध पाहिला तर आपल्या हे सहजच लक्षात येईल की राजकारणाचा मूळ स्वभावधर्मच असा आहे की त्यात असत्य हे पूर्णपणे निषिद्ध कधीच मानलं गेलेलं नाही. निदान 'नरो वा कुंजरो वा' अशी भूमिका तरी घ्यावीच लागते हे जवळजवळ सर्वमान्य आहे. पण तिथून सुरुवात करून आता आज राजकारणात असत्याला प्रतिष्ठा मिळवून दिली गेली आहे आणि त्यातून नागरिकांची दिशाभूल केली जाते आहे. असत्य हे असत्य असल्याने त्याचा निषेध करताना माझ्यासारख्या नागरिकाने माझ्या पक्षीय झुकावाच्या पलीकडे जात तो नोंदवला पाहिजे. त्यामुळे राहुल गांधी जर असत्य बोलले असतील तर त्याचा मी स्पष्ट शब्दात निषेध करायलाच हवा आणि केशव उपाध्ये यांचा दावा सत्य असेल तर तो निषेध मी इथे नोंदवतोदेखील. लोकशाहीत नागरिकांनी स्वायत्त संस्थांप्रमाणेच राजकीय पक्षांवर नजर ठेवणं आणि त्यांना आवश्यक तिथे टोकत राहणं आवश्यकच आहे. त्यामुळे राहुल गांधीच नव्हे तर काँग्रेस किंवा 'इंडिया आघाडी'तील अन्य कुठल्याही पक्षातील कुणाहीकडून असत्य बोललं गेलं असेल तर त्याचा निषेध करणं हे नागरिक म्हणून माझं कर्तव्यच आहे. आता दुसऱ्या बाजूने पाहता मी वर भाजपबद्दल आणि भाजपच्या असत्य पसरवण्याच्या 'संस्थात्मक उभारणी'बद्दल जे काही मांडलं आहे त्यावर विचार केला, ते पटलं तरी भाजपचे प्रवक्ते असल्याने केशव उपाध्ये त्यावर काही बोलणार नाहीत हे उघड आहे. पण प्रवक्तेपदाच्या पलीकडे तेही माझ्यासारखाच एक 'नागरिक-माणूस'ही आहेत आणि त्या माणसाला माझं म्हणणं पटेल असा माझा विश्वास आहे. माणसांमधला, नागरिकांमधला 'प्रवक्ता', 'समर्थक' जाऊन तिथे 'माणूस' जागा होण्याची आज कधी नव्हे इतकी गरज आहे! आणि हे म्हणणाऱ्या माझ्यासारख्यानंदेखील स्वत:ला या बाबतीत तपासत राहिलं पाहिजे. असं झालं तरच काहीएक 'मूल्यात्मक आशा' शिल्लक राहील!

# लोकसंख्याशास्त्र हा शैक्षणिक विभाग हवा

भारत आता जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश असल्याने, संबंधित आव्हानांचा सामना करण्यासाठी नावीन्यपूर्ण तसेच समग्र दृष्टिकोन स्वीकारणे अत्यावश्यक आहे. आजच्या (११ जुलै) जागतिक लोकसंख्यादिनाच्या निमित्ताने गेल्या वर्षी एप्रिलमध्ये (२०२३) चीनला मागे टाकत भारत जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश बनला; भारताची लोकसंख्या सुमारे १.४ अब्ज असून ती जागतिक लोकसंख्येच्या १७.७६ % इतकी आहे. भारत देश हे लोकसंख्येचे आव्हान कसे हाताळतो याकडे उर्वरित जगाचे लक्ष आहे. या लेखात लोकसंख्येच्या आव्हानांचा सामना करण्यासाठी समग्र दृष्टिकोनातून पुढील मार्गांची चर्चा केली आहे. सर्वप्रथम, सार्वजनिक माहिती आणि विदा यांचा प्रसार वेळेवर करणे गरजेचे आहे. भारताने २०२१ ची जनगणना पुढे ढकलली, त्याचे परिणाम दूरगामी असतील. अनेक विश्वासार्ह सर्वेक्षण अंदाज हे जनगणनेच्या आकडेवारीवर लक्षणीयरीत्या अवलंबून असतात, त्यांमध्ये अचूकता आणण्यासाठी त्वरित जनगणना करणे आवश्यक आहे. तसेच, सामाजिक आणि आर्थिक जनगणना, बेरोजगारी आणि गरिबीच्या आकडेवारीसह अनेक महत्त्वपूर्ण आकडेवारी सार्वजनिकरित्या जाहीर करावी. हा विदा उघड न केल्यामुळे पुरावा-आधारित संशोधन आणि धोरणे तयार करण्यात अडथळा येतो. शिवाय, केवळ जन्म आणि मृत्यूच नव्हे तर आजारपणे आणि स्थलांतराचीही स्थानिक पातळीवरील नोंदणी वाढवणे आवश्यक आहे. स्थानिक कर्मचाऱ्यांची क्षमता बळकट करणे आणि विदा प्रणालींचे नियमित मूल्यांकन हे मजबूत विदा व्यवस्थापनासाठी आवश्यक आहे. सरकारी नियोजन आणि धोरण निर्मिती प्रभावी होण्यासाठी ही पावले गरजेची आहेत. याबरोबरच सरकारने केवळ संख्यात्मक आकडेवारी आणि सांख्यिकीशास्त्रज्ञांच्या कार्यक्षेत्राच्या पलीकडे लोकसंख्येच्या समस्यांवरील आपला दृष्टीकोन व्यापक केला पाहिजे. स्थानिक पातळीवरील नियोजन परिणामकारक करण्यासाठी आंतरशाखीय पार्श्वभूमी असलेल्या प्रशिक्षित जिल्हा/विभागीय पातळीवरील लोकसंख्या अधिकाऱ्यांची भरती करणे गरजेचे आहे. हे अधिकारी स्थानिक पातळीवर लोकसंख्येवर आधारित आर्थिक, सांख्यिकी, सार्वजनिक आरोग्य धोरणे ठरवणे आणि त्यांची योग्य अंमलबजावणी करणे ही कामे उत्तमरीत्या पार पाडू शकतात. त्यासाठी भारतातील लोकसंख्या अभ्यासाच्या शिक्षणाला चालना देण्याची अत्यंत गरज आहे. जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश असूनही, भारताकडे सध्या लोकसंख्याशास्त्रासाठी समर्पित शैक्षणिक विभाग खूप मर्यादित आहेत. विद्यापीठांमध्ये लोकसंख्याशास्त्राचा विस्तार केल्याने या विषयाच्या महत्त्वाविषयी जागरूकता वाढेल आणि जटिल लोकसंख्येच्या आव्हानांचा प्रभावीपणे सामना करण्यास सक्षम कुशल मनुष्यबळ तयार होईल. लोकसंख्या दिन मोहिमेचे उद्दिष्ट कुटुंब नियोजन आणि प्रजनन आरोग्य सेवांविषयी जागरूकता वाढवणे हे आहे जेणेकरून प्रत्येक बाळाला निरोगी आणि संपन्न जीवनाची संधी मिळेल. तथापि, कुटुंब नियोजनाचा भार प्रामुख्याने महिलांवर पडतो. राष्ट्रीय कुटुंब स्वास्थ्य सर्वेक्षणानुसार (छऋक्ष्ठ-५), पुरुषांच्या नसबंदीचे प्रमाण १ % पेक्षा कमी (फक्त ०.३%) आहे, तर महिलांच्या नसबंदीचे प्रमाण अंदाजे ३८ % आहे. हा लिंग-केंद्रित दृष्टिकोन कुटुंब नियोजनाच्या उपक्रमांमध्ये पुरुषांना सक्रियपणे सहभागी करण्याची गरज अधोरेखित करतो. शिवाय, अलीकडील चर्चित असलेली बंधनपूर्वक लोकसंख्या नियंत्रण धोरणे ही लैंगिक विषमता आणखी वाढवतील. पुरुष आणि स्त्रिया दोघांनाही सुरक्षित आणि प्रभावी कुटुंब नियोजन पद्धतींसाठी सर्वसमावेशक धोरणांची आवश्यकता भासते ज्यामुळे केवळ अवांछित गर्भधारणा कमी होत नाही तर मातेचे आरोग्य सुधारते आणि गरिबी दूर होते. भारताला समकालीन लोकसंख्याशास्त्रीय कल अधोरेखित करणाऱ्या अद्ययावत लोकसंख्या धोरणाची तातडीने गरज आहे. राष्ट्रीय लोकसंख्या धोरण (२०००) कालबाह्य झाले असून ते अलीकडील लोकसंख्येतील घडामोडींशी जुळत नाही. प्रगत आणि शाश्वत लोकसंख्येची उद्दिष्टे निश्चित करण्यासाठी सध्याच्या जनगणनेच्या आकडेवारीवर आधारित नवीन धोरण तयार करणे अत्यावश्यक आहे. बालमृत्यूचे प्रमाण कमी करणे, लसीकरण व्याप्ती आणि संस्थात्मक प्रसूती यामध्ये सुधारणा झाली असली तरी, अजूनही बालविवाहाचे प्रमाण, मुलांमधे अंतर राखण्यासाठी गर्भनिरोधकाचा अपुरा वापर, विशेषतः पुरुषांमध्ये प्रौढ मृत्यूदरातील वाढ आणि वृद्धांची वाढती लोकसंख्या यासारखी नवीन आव्हाने उभी आहेत. या आव्हानांचा सामना करण्यासाठी लोकसंख्या आणि विकास निर्देशकांमधील प्रादेशिक विषमतेला ध्यानात ठेवून नाविन्यपूर्ण दृष्टिकोन अवलंबणे आवश्यक आहे. सुधारित लोकसंख्या धोरणात सर्वसमावेशक आणि प्रभावी लोकसंख्या व्यवस्थापन धोरणे सुनिश्चित करण्यासाठी भविष्यातील जनसांख्यिकीय स्थिती आणि गतिशीलतेला प्राधान्य दिले पाहिजे. लोकसंख्येचे नवीन धोरण ताज्या जनगणनेच्या आकडेवारीवर आधारित असले पाहिजे. जागतिक लोकसंख्येपैकी जवळजवळ निम्मी लोकसंख्या महिलांची आहे, जागतिक लोकसंख्या दिनाच्या संकल्पनांमध्ये लैंगिक समानतेवर सातत्याने भर दिला जातो. लैंगिक समानतेचा लांबचा पल्ला गाठण्यासाठी आधी महिलांचे सक्षमीकरण आवश्यक आहे. रोजगाराच्या वाढीव संधींच्या माध्यमातून महिला श्रमशक्तीचा लाभ घेतल्याने भारताला मोठा फायदा होणार आहे. महिला पदवीधरांमध्ये लक्षणीय वाढ झाली असली तरी, त्यांपैकी अनेकजणी उत्पादक आर्थिक कार्यात सक्रिय नाहीत, ज्यामुळे या न वापरलेल्या प्रतिभेचा उपयोग करण्याची



गरज अधोरेखित होते. प्रसूतीनंतर महिलांना पुन्हा कार्यबलात प्रवेश करण्यास प्रोत्साहित करणे आवश्यक आहे, तरीही वाढती विभक्त कौटुंबिक संरचना लक्षात घेता पुनः रोजगाराच्या सुलभ संधी आणि परवडणाऱ्या बालसंगोपनाच्या सुविधा यासारख्या उपाययोजना पूरक ठरतील. वर्क फ्रॉम होम किंवा हायब्रिड मॉडेल्ससारख्या परिवर्तनशील कामकाजाच्या व्यवस्थेला प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. महिला कामगारांचा सहभाग अधिक सुलभ करण्यासाठी सरकार, अनौपचारिक क्षेत्रे आणि खाजगी उद्योग यांच्यात समन्वय आवश्यक आहे. लिंग धोरणांमध्ये प्रादेशिक आणि आंतरक्षेत्रीय बारकावे विचारात घेतानाच अनुसूचित जाती/जमाती आणि उच्च सामाजिक गट यांच्या परिणामकारकतेतील फरकही अधोरेखित व्हायला हवा. महिलांच्या शिक्षणात आणि रोजगारात गुंतवणूक केल्याने लक्षणीय परतावा मिळतो, ज्यामुळे बालविवाह कमी होण्यास, प्रजनन दर कमी होण्यास आणि अगदी तरुण महिलांमधील प्रसूती कमी होण्यास महत्त्वपूर्ण योगदान मिळते. त्यांच्या संपूर्ण व्यावसायिक प्रवासात महिलांना आधार देणारे सक्षम वातावरण निर्माण करण्याची जबाबदारी केवळ सरकारचीच नसून समाजाचीसुद्धा आहे. इंडिया स्किल्स रिपोर्ट २०२२ मध्ये प्रचलित कौशल्य तफावत अधोरेखित केली गेली आहे, सुमारे ७५% प्रतिसादकर्त्यांनी ही विषमता दर्शविली आहे, तर त्यात निम्म्याहून कमी भारतीय रोजगारयोग्य आहेत. ही परिस्थिती जनसांख्यिकीय लाभांशाचा वापर करण्यासाठी एक प्राथमिक आव्हान आहे. युवकांची रोजगारक्षमता आणि रोजगाराच्या संधी वाढवणे वाढवणे आवश्यक आहे. लोकसंख्येची वाढ मर्यादित करण्याचा प्रयत्न करण्याऐवजी, भारताने उत्पादकता आणि रोजगारक्षमता वाढवण्यासाठी आपल्या लोकसंख्येचे धोरणात्मक नियोजन आणि व्यवस्थापन केले पाहिजे. प्रधानमंत्री कौशल विकास योजना आणि प्रगत व्यावसायिक प्रशिक्षण योजना यासारख्या उपक्रमांची अंमलबजावणी केली गेली असली तरी तळागाळात त्यांचा प्रत्यक्ष प्रभाव मात्र मर्यादित दिसतो. जनसांख्यिकीय लाभांशाचा पूर्णपणे लाभ त्याच्या प्रतिकूल परिणामांशिवाय घ्यायचा असेल तर योग्य आर्थिक नियोजनासह लक्ष्यित कौशल्य विकासामध्ये गुंतवणूक वाढवण्याची तातडीची गरज आहे. हा संभाव्य जनसांख्यिकीय फायदा पुढील काही दशके टिकेल असा अंदाज आहे. जगात विकसित देशातील लोकसंख्या वृद्धत्वाच्या उंबरठ्यावर असताना आपल्या देशाच्या युवकांच्या क्षमतेचा योग्य उपयोग करायच्या मुबलक संधी उपलब्ध आहेत, त्या दवडता कामा नयेत. यासाठी तरुण पदवीधरांना कामगारवर्गात सामावून घेण्यासाठी उत्पादन क्षेत्राचा विस्तार करणे आवश्यक आहे. कौशल्ये वाढवणे, रोजगारक्षमता वाढवणे आणि रोजगार निर्मितीला चालना देणे या सध्यासाठी आणि भविष्यातील राष्ट्रीय विकासाला चालना देण्यासाठी महत्त्वपूर्ण पायऱ्या आहेत. प्रजनन दर आणि मृत्यूचे प्रमाण कमी झाल्यामुळे आयुर्मान वाढते. परिणामी येणारे लोकसंख्येचे वृद्धत्व आपल्या देशातही फार लांब नाही. या जनसांख्यिकीय बदलामुळे वृद्धापकाळातील आरोग्य आव्हानांचा सामना करणाऱ्या वृद्ध व्यक्तींना सहाय्यित जीवन जगण्यास प्रवृत्त करण्यासाठी मजबूत सामाजिक सुरक्षा चौकट आवश्यक आहे. त्यासाठी सामाजिक संरक्षण प्रणालीला प्रोत्साहन देणे महत्त्वाचे आहे. विशेतः अनौपचारिक क्षेत्रातील कर्मचाऱ्यांसाठी न्याय्य निवृत्तीवेतन योजना, निवृत्तीनंतर सुरक्षित उपजीविका सुनिश्चित करणे यासह ज्येष्ठ नागरिकांसाठी संरक्षणात्मक उपायांची अंमलबजावणी करण्यासाठी सरकारी आणि अशासकीय दोन्ही क्षेत्रांनी त्यांची क्षमता वाढवली पाहिजे. वयाच्या साठीनंतरही काम सुरू ठेवण्यास इच्छुक असलेल्यांसाठी अनुकूल कामकाजाचे वातावरण निर्माण केल्याने वृद्ध लोकसंख्येच्या जीवनाचा दर्जा नक्कीच सुधारेल. कुटुंब नियोजन आणि कल्याण, कौशल्य-आधारित शिक्षण आणि सार्वजनिक आरोग्य यासारख्या प्रमुख क्षेत्रांमध्ये पुरेशी गुंतवणूक गरजेची असते. त्यासाठी राष्ट्रीय जीडीपीच्या किमान ५-६ % असे भरीव वाटप आवश्यक आहे. यासाठी निधीचे योग्य वाटप हाच पर्याय आहे. आर्थिक सर्वेक्षण (२०२२-२३) मध्ये अधोरेखित केल्याप्रमाणे, सार्वजनिक आरोग्य (२.१ %) आणि शिक्षण (२.९ %) यासारख्या महत्वाच्या क्षेत्रांमध्ये इष्टतम मर्यादेपेक्षा खूप कमी खर्च करण्याची पातळी दर्शविली गेली आहे. परिणामतः मानवी विकास निर्देशांकात जागतिक पातळीवर भारताची क्रमवारी समाधानकारक नाही (२०२३-२४ च्या एचडीआर अहवालानुसार १९३ देशांपैकी भारत १३४ व्या क्रमांकावर आहे ). याशिवाय शाश्वत विकास उद्दिष्टांच्या दिशेनेही भारताची वाटचाल मंद आणि कमी प्रगती असलेली आहे (२०२३ मध्ये ११२ वा क्रमांक ). सर्वांगीण आणि शाश्वत विकासासाठीचा अपुरा निधी हे अशा निराशाजनक कामगिरीमागील प्रमुख कारण आहे. सर्वसमावेशक राष्ट्रीय विकासाला चालना देण्यासाठी, सरकारने अनावश्यक खर्चांची छाननी करून आणि ते खर्च कमी करून संसाधनांचे पुनर्वितरण केले पाहिजे, ज्यामुळे महत्त्वपूर्ण विकास क्षेत्रांमध्ये गुंतवणुकीला चालना मिळेल. भारताच्या जनसांख्यिकीय आव्हानांचा सामना करण्यासाठी व शाश्वत राष्ट्रीय प्रगतीसाठी आणि त्याच्या जनसांख्यिकीय लाभांचा प्रभावीपणे लाभ घेण्यासाठी वर नमूद केलेले मार्ग अंगिकारायला हवेत. सामान्यतः प्रसारमाध्यमांमध्ये जसे दाखवले जाते तसे लोकसंख्येचे प्रश्न केवळ कुटुंब नियोजनावर केंद्रित नसून त्या पलीकडे विस्तारलेले आहेत. व्यक्तींच्या विकासाला आणि सक्षमीकरणाला प्राधान्य दिले तर कालांतराने सामाजिक प्रगती होत कुटुंब नियोजनाशी संबंधित समस्या स्वाभाविकपणे दूर होतात. तत्वतः आणि व्यवहारात, कुटुंब नियोजनाऐवजी कौटुंबिक कल्याणावर भर देणे महत्त्वाचे आहे. कुटुंब कल्याणाच्या सर्वसमावेशक दृष्टिकोनातून, पुरुष आणि स्त्रिया दोघांनाही त्यांच्या प्रजननक्षमतेबद्दल आणि पुनरुत्पादक आरोग्याबद्दल माहितीपूर्ण निर्णय घेण्यास सक्षम केले पाहिजे. पुनरुत्पादक आरोग्य सुविधांमध्ये न्याय्य सुविधा सुनिश्चित करणे हे सरकारचे प्राधान्य राहिले पाहिजे. केवळ कुटुंब नियोजनाच्या दृष्टीकोनातून लोकसंख्येच्या समस्यांचे निराकरण करणे अपुरे आहे. हे मुद्दे सामाजिक नियम आणि सांस्कृतिक प्राधान्यांशी जोडलेले आहेत आणि गरिबी आणि बहिष्करणामुळे ते अधिक तीव्र झाले आहेत. अशा प्रकारे, त्यांचे निराकरण करण्यासाठी नसबंदी आणि गर्भनिरोधक यासारख्या ऐतिहासिक पद्धतींच्या पलीकडच्या बहुआयामी दृष्टिकोनाची आवश्यकता आहे. सर्वसमावेशक आणि शाश्वत लोकसंख्या विकास साध्य करण्यासाठी, व्यापक सामाजिक-आर्थिक विकासाकडे आणि वर्तनात्मक बदलांना चालना देण्याकडे लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. वर्तणूक आणि सामाजिक निकषातील बदल ही एक हळूहळू होणारी प्रक्रिया असली तरी, विकास आणि कल्याणावर केंद्रित धोरणांनी दीर्घकालीन परिणामकारकता दर्शविली आहे. शिवाय, जनसांख्यिकीय लाभांशाचा फायदा घेण्यासाठी, कौशल्य-आधारित शिक्षणाकडे लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. यामध्ये २१ व्या शतकातील गुंतागुंतींच्या जीवनाचा सामना करण्यासाठी, व्यक्तींना सुसज्ज करणाऱ्या जीवन कौशल्यांना प्रोत्साहन देणे उचित ठरेल. लोकांच्या विशेतः तरुणांच्या समस्या सोडवण्याच्या आणि तर्कशुद्ध निर्णय घेण्याच्या क्षमतांना चालना देणे आणि मानसिक आणि भावनिकदृष्ट्या लवचिक कार्यबळ बनवणे याला प्राधान्य देणे गरजेचे आहे. वरच्या केंद्रीय पातळीवरून तळागाळापर्यंत नव्हे तर तळापासून वरपर्यंत जाणारा दृष्टिकोन अवलंबणे आवश्यक आहे. स्थानिक पातळीवर अधिक प्रभावी सिद्ध झालेल्या लोक-केंद्रित योजना अवलंबणे हा आदर्श बदल सद्य व्यवस्थेत आवश्यक आहे. महत्त्वाचे म्हणजे, लोकसंख्या केवळ आकडेवारीपुरती मर्यादित ठेवू नये; त्याऐवजी, व्यक्ती, त्यांचे आरोग्य, मानसिक आणि भावनिक कल्याण आणि त्यांच्या जीवनाच्या एकूण गुणवत्तेवर लक्ष केंद्रित करणे असा अधिक सहानुभूतीशील दृष्टीकोन आवश्यक आहे. भारताची जनसांख्यिकीय प्रगमनशीलता, संधी आणि आव्हाने स्वीकारण्यासाठी पारंपारिक कुटुंब नियोजनाच्या दृष्टिकोनांच्या पलीकडे जाऊन धोरणात्मक आणि कार्यक्षम उपाय अवलंबणे आवश्यक आहे. २१ व्या शतकात भारताला जागतिक महासत्ता म्हणून स्थापित करण्यासाठी लोकसंख्येकडे मर्यादित संसाधनांवरील ओझे म्हणून नव्हे, तर आर्थिक आणि सामाजिक वाढीस चालना देण्यास सक्षम असलेली एक मौल्यवान साधनसंपत्ती म्हणून पाहणे उचित ठरेल.

# अल्सरचा त्रास, पोटही बिघडतंय? जिरं, ओवा व ‘या’ मसाल्याचा वापर देईल चुटकीसरशी आराम; खाण्याची योग्य पद्धत वाचा



पावसाळ्याच्या दिवसांमध्ये संसर्गाचा धोका अधिक असतो. विशेषतः पाण्यातून पसरणारे आजार या महिन्यांमध्ये डोकं वर काढतात. काही वेळा आपल्या शरीराची रोगप्रतिकारक शक्ती या आजाराच्या विषाणुंसमोर दुबळी पडते. मुख्यतः यामुळे पचनाचे आजार बळावतात. तुम्हालाही या पावसात तुमच्या आतड्यांचे, पोटाचे आरोग्य जपायचे असेल तर आपण आहारात काही गोष्टींचा आवर्जून समावेश करायला हवा. काळजी करू नका, कुठलाही वेगळा खर्च वाढवणारा उपाय आम्ही तुम्हाला करायला सांगणार नाही आहोत. उलट तुमच्या किचनमधील काही मसाले वापरून तुम्ही तुमच्या आतड्यात सूक्ष्मजंतू जाण्यापासून रोखू शकता. हे मसाले म्हणजे जिरं, कलौंजी (काळं जिरं किंवा नायगेला बी) आणि ओवा. आता आपण इंद्रप्रस्थ अपोलो हॉस्पिटल्सच्या पोषणतज्ज्ञ कनिका नारंग यांनी इंडियन एक्सस्प्रेसला सांगितले मसाल्यांच्या सेवनाचे फायदे व योग्य पद्धत जाणून घेऊया..

पावसाळ्यात जिऱ्याच्या सेवनाचा फायदा जिऱ्यामध्ये लोह, मॅग्नेशियम, कॅल्शियम आणि ए, सी व ई जीवनसत्व मुबलक प्रमाणात असते. खरं तर, जीवनसत्व सी चा मोठा साठा असल्याने पोटाच्या संक्रमणाला आळा घालण्यास जिऱ्याची मदत होते. काही खाल्ल्यावर आपल्याला उलट्या होणे किंवा पोटात अस्वस्थ जाणवणे असे त्रास होत असतील तर त्यावर जिरं हा सर्वोत्तम उपाय आहे. जिऱ्यामुळे स्वादुपिंडाच्या एन्झाईम्सचा स्त्राव उत्तेजित होतो.

फॅट्स, प्रथिने आणि कार्ब्सच्या पचनास मदत होते. जिऱ्यामधील थायमोक्विनोन हे नैसर्गिक संयुग यकृताचे रक्षण करते. पावसाळ्यात अपचन, पोटात गॅस होणे आणि जुलाब यांसारखे पचनाचे विकार होण्यापासून जिरं आपल्याला वाचवू शकतं. शिवाय जिऱ्यामध्ये जिरायडीहाइड सारखे अँटिऑक्सिडंट्स असतात जे जळजळ कमी करण्यास मदत करू शकतात.

सर्वोत्तम वापर: तुमच्या जेवणात एक चमचा भाजलेले जिरे किंवा जिऱ्याची पावडर घाला. गरम पाण्यात जिरे उकळून आपण याचा हेल्दी चहा सुद्धा बनवू शकता.

कलौंजी कशी खावी? कलौंजीमध्ये आवश्यक फॅटी ॲसिडस्, अमीनो ॲसिडस, कॅल्शियम, लोह व पोटॅशियम यांचा साठा असतो. शिवाय या बियांमधील थायमोक्विनोन हे मुख्य अँटिऑक्सिडंट सूक्ष्मजंतूंना दूर करते. यामुळे पाचक रसाचा व एन्झाईम्सचा स्त्राव वाढतो. पोटात गोळा येणे, गॅस होणे, बद्धकोष्ठ अशा समस्यांना कलौंजीच्या बिया आळा घालू शकतात. कलौंजीमधील दाहक-विरोधी गुणधर्म अल्सरची वाढ रोखण्यासाठी आणि मद्यपानामुळे पोटाच्या अस्तरांचे झालेले नुकसान दुरुस्त करण्यासाठी प्रभावी असतात.

सर्वोत्तम वापर: कलौंजीच्या बिया सॅलेडमध्ये घालू शकता, ब्रेड आणि बेक केलेल्या पदार्थांच्या रेसिपीमध्ये जोडू शकता. अगदी भाकरी, पोळीवर सुद्धा लावू शकता, किंवा मधासह या बिया खाल्ल्या तरी चालेल.

ओव्याचे फायदे ओव्याच्या बियांमध्ये थायमॉलसारखे आवश्यक ऑईल असते, जे त्याच्या प्रतिजैविक आणि अँटीसेप्टिक गुणधर्मांसाठी ओळखले जाते. फायबर, जीवनसत्त्वे आणि खनिजे देखील ओवा शरीराला प्रदान करतो.ओव्यामुळे जठरात पाचक रसाचा स्त्राव वाढून आतड्यांमधील पचन जलद होऊ शकते. यामुळे अपचन, गॅस आणि सूज दूर करण्यास मदत होते. पेप्टिक अल्सर, तसेच अन्ननलिकेत, पोटात, आतड्यांमध्ये आलेल्या फोडांवर सुद्धा ओवा उपचार करू शकतो.

सर्वोत्तम वापर: जेवणानंतर ओव्यामध्ये चिमूटभर मीठ घालून खाऊ शकता किंवा ओवा पाण्यात उकळून चहा करून पिऊ शकतो. १ ते ५ ग्रॅम ओवा उकळत्या पाण्यात घालून थोडा वेळ ओव्याच्या बिया फुलू द्या. हे कोमट पाणी शरीरात थायमॉलचे शोषण वाढवते. अधिक फायद्यांसाठी सकाळी लवकर ओव्याचे पाणी प्या. स्वयंपाकात काही पदार्थांमध्ये सुद्धा आपण ओवा वापरू शकता.

# रात्री ९ ऐवजी संध्याकाळी ६ पर्यंत जेवण केल्यास तुमच्या शरीरामध्ये काय बदल होतात? तज्ज्ञांनी केला खुलासा



बऱ्याच भारतीय घरांमध्ये रात्रीचे जेवण उशिरा होणे ही सर्वसामान्य गोष्ट आहे. सहसा रात्री ९ किंवा ९:३० पर्यंत कुटुंबातील सर्व जण एकत्र जेवतात. अधिकाधिक संशोधनातून असे निष्कर्ष समोर आले आहेत की, सायंकाळी ६ च्या दरम्यान रात्रीचे जेवण करणे तुमच्या आरोग्यासाठी आणि एकूणच आरोग्यासाठी चांगले असू शकते. न्यूट्रिएंट्स या जर्नलमध्ये प्रकाशित झालेल्या २०२१ च्या अभ्यासानुसार, रात्रीचे जेवण उशिरा केल्याने उंदीर आणि मानव दोघांमध्ये शरीरातील साखर आणि इन्सुलिन हाताळण्याच्या क्षमतेला हानी पोहोचते. याशिवाय अर्ली टाईम-रिस्ट्रिक्टेड इटिंग नुसार, लवकर सायंकाळी लवकर जेवण करणे आवश्यक आहे. त्यामुळे दोन जेवणादरम्यानचा कालवधी वाढतो. रक्तातील ग्लुकोज, इन्सुलिन संवेदनशीलता, रक्तदाब आणि ट्रायग्लिसराइड्स यावर याचा सकारात्मक परिणाम दिसून येतो. विशेषतः जास्त वजन असलेल्या किंवा लठ्ठ लोकांसाठी हे फायदेशीर ठरते. तुम्ही ९ ऐवजी रोज ६ वाजता जेवण केल्यास तुमच्या शरीरात काय बदल होतात आणि तुमच्या दैनंदिन दिनचर्येसाठी ते का विचारात घेण्यासारखे आहेत, याबाबत बंगळुरूच्या फोर्टिस हॉस्पिटलच्या कन्सल्टंट गॅस्ट्रोएन्टेरोलॉजिस्ट डॉ. प्रणव होन्नावरा श्रीनिवासन यांनी द इंडियन एक्स्प्रेसला माहिती दिली आहे. संध्याकाळी ६ वाजता जेवण केल्यास तात्काळ शरीरात काय बदल होतो? डॉ. श्रीनिवासन सांगतात, तुमचे रात्रीचे जेवण रात्री ९/९:३० ऐवजी संध्याकाळी ६ वाजेपर्यंत केल्याने तुमच्या शरीरात बदल घडून येतात. संध्याकाळी तुम्हाला लगेच ऊर्जा वाढल्याचे लक्षात येईल. तुमचे शरीर झोपण्यापूर्वी जड अन्न पचण्यामध्ये व्यस्त नसते. या बदलामुळे रात्रीच्या वेळी छातीत जळजळ आणि अपचन यांसारख्या सामान्य पचनसंस्थेतील अस्वस्थतादेखील कमी होऊ शकते, कारण झोपण्यापूर्वी तुमचे पोट रिकामे होण्यासाठी जास्त वेळ मिळतो. शिवाय त्यांनी ‘जर्नल ऑफ क्लिनिकल एंडोक्रिनोलॉजी अँड मेटाबॉलिझम’मध्ये प्रकाशित केलेल्या संशोधनाचा हवाला दिला जे सूचित करते की, लवकर जेवण केल्याने रात्रीच्या वेळी रक्तातील साखरेची पातळी अधिक स्थिर होते, संभाव्यत: झोपेची गुणवत्ता आणि सकाळची सतर्कता सुधारते. चयापचय आणि पचन वर परिणाम डॉ. श्रीनिवासन यांच्या मते, सायंकाळी ६ वाजता जेवणे तुमच्या शरीराच्या नैसर्गिक झोपेचे चक्राशी (सर्केडियन लय) जुळते. झोपेचे चक्र हे चयापचयसह विविध शारीरिक प्रक्रिया नियंत्रित करणारे शरीराचे घड्याळ आहे. रात्रीचे जेवण उशिरा केल्यास झोपेच्या चक्रामध्ये व्यत्यय येतो, संभाव्यतः पचनक्रिया बिघडते आणि वजन वाढण्यास हातभार लावते. ते पुढे सांगतात, ‘करंट बायोलॉजी’मधील संशोधन दाखवते की, अर्ली टाईम-रिस्ट्रिक्टेड फिडिंग नुसार, रात्रीचे जेवण ६ वाजता केल्यास उपवासानंतर रक्तातील साखर आणि इन्सुलिन संवेदनशीलता यांसारख्या चयापचय कार्यात सुधारणा होते.

# हर्बल पान मसाला तंबाखू, गुटख्याचे व्यसन सोडण्यासाठी सुरक्षित आहे का? तज्ज्ञ काय सांगतात

भारतातील अनेक लोक पान मसाला आणि गुटखा यांसारख्या तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन करतात. या तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन शहरी आणि ग्रामीण अशा दोन्ही भागांत प्रचलित आहे, ज्यामुळे मौखिक आरोग्याच्या अनेक गंभीर समस्या उद्भवतात. या समस्यांमुळे बऱ्याचदा घातक रोगांचा धोका वाढतो. हे धोके, समस्या माहीत असूनही लोक या पदार्थांच्या व्यसनाधीन झाले आहेत, त्यामुळे हे व्यसन सोडवणे खूप कठीण झाले आहे. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ हेल्थ (२०१६) च्या संशोधन अभ्यासानुसार, ल्युकोप्लाकिया, सबम्यूकस फायब्रोसिस, एरिथ्रोप्लाकिया आणि लाइकेन प्लॅनस यांसारख्या मौखिक कर्करोगाच्या स्थितीचे प्रमाण तंबाखूचे सेवन न करणाऱ्यांमध्ये ३.१७ टक्के आणि तंबाखू सेवन करणाऱ्यांमध्ये १२.२२ टक्के होते.इंडियन जर्नल ऑफ कॅन्सर (२०१५) च्या दुसऱ्या अभ्यासात पान मसाल्याच्या जीनोटॉक्सिक प्रभावांवर प्रकाश टाकण्यात आला आणि हेपॅटोटॉक्सिसिटीची नोंद करण्यात आली, ज्यामध्ये वाढलेली एंजाइमची पातळी आणि बाधित कार्बोहायड्रेट तसेच लिपिड चयापचयची विशेषतः आहे. तसेच नेफ्रोटॉक्सिसिटी जे क्रिएटिनिनच्या स्तरात वाढ आणि शुक्राणूंच्या विकृतीद्वारे दर्शविली जाते. डॉ. रवी कुमार झा, फोर्टिस एस्कॉर्ट्स हॉस्पिटल, फरिदाबाद येथील पल्मोनोलॉजिस्ट म्हणाले की, पान मसाल्यातील निकोटीन आणि इतर सायकोएक्टिव्ह पदार्थ मज्जासंस्थेला उत्तेजित करतात, ज्यामुळे काही क्षण शरीरात सतर्कता आणि उत्साही असल्यासारखे वाटते. ज्यामुळे नंतर व्यसन, चिडचिडेपणा आणि चिंता यांसारखी लक्षणे दिसून येतात. ते पुढे म्हणाले की, पान मसाल्याचा दीर्घकाळ वापर केल्याने रोगप्रतिकारकशक्ती कमकुवत होऊ शकते, ज्यामुळे शरीराला संक्रमण आणि गंभीर रोग होण्याची शक्यता वाढते. पारंपरिक पान मसाल्यामध्ये कात, सुपारी, चुना, बडीशेप, वेलची, गोड पदार्थ, पुदिन्याची पाने, मेन्थॉल आणि तंबाखूसह किंवा त्याशिवाय विविध चव वाढवणाऱ्या पदार्थांचा समावेश असतो. डॉ. सुषमा सुमित, आयुर्वेद चिकित्सक आणि पुण्यातील इंटिग्रेटेड कॅन्सर ट्रीटमेंट अँड रिसर्च सेंटर मधील वरिष्ठ रिसर्च फेलो यांनीदेखील सांगितले की, तंबाखूसह खजूर, गुलाबाच्या पाकळ्या, गुलकंद यांसारख्या गोड पदार्थांचा वापर केला जातो. यात पचनासंबंधित गुण तसेच एक उत्तम गंध असतो. परंतु, हे नियमित सेवन करू नये; विशेषतः तंबाखूसह याचे सेवन योग्य मानले जात नाही.या पार्श्वभूमीवर आयुर्वेदिक पान मसाला आणि गुटखा यांसारख्या आयुर्वेदिक घटकांनी बनवलेले पर्यायी हर्बल पदार्थ आणण्यात आले आहेत, जे तुमच्या सतत चघळण्याच्या सवयींमध्ये बदल घडवू शकतात. पण, यांचा वापर करणं योग्य आहे का? हे योग्य काम करतात का? हर्बल पान मसाल्यांमध्ये कौंच बीजा (मुकुना प्रुरिएन्स बियाणे), चिंच, आवळा, हळद, वेलची, केशर, अश्वगंधा, ग्लायसिरिझा ग्लेब्रा, मेन्थॉल आणि इतर फायदेशीर औषधी वनस्पती असतात. हे तंबाखूपासून मुक्त आणि याचे व्यसन लागत नाही, असे सुमित यांनी सांगितले. आयुर्वेदिक अभ्यासक डॉ. दीक्षा भावसार सावलिया यांनी सांगितले की, हे मिश्रण तुम्हाला ताजेतवाने ठेवतात, यामुळे दुर्गंधी टाळता येते आणि हे पचनास मदत करतात, तंबाखूचे सेवन करणाऱ्यांसाठी संभाव्य बदल म्हणून हे योग्य काम करते आणि त्यांना व्यसन सोडण्यापासून दूर करण्यास मदत करते.आयुष वेलनेस, गुडका, उत्तर प्रदेशचे हर्बी च्यू आणि सरकारचे सीएसआईआर-सेंट्रल इन्स्टिट्यूट ऑफ मेडिसिनल अँड रोमॅटिक प्लांट्स (सीआयएमएपी) यांसारखे ब्रँड अशा हर्बल माउथ फ्रेशनर्स बनवतात. यांची किंमत पाच पॅकेटसाठी २९५ रुपयांपासून ते ५० पॅकेटसाठी ३९५ रुपयांपर्यंत आहे. महाराष्ट्राच्या अन्न आणि औषध प्रशासनाने (एफडीए) मान्यता दिली आहे, ते उत्पादन अधिक चघळण्यायोग्य आणि आनंददायक बनवण्यासाठी आयुर्वेदिक औषधी वनस्पती आणि बियांचा वापर करतात. हे उत्पादन तंबाखूजन्य पदार्थांच्या सवयीनुसार खाण्यावर काम करते, ज्यामुळे व्यसनी लोकांना तंबाखूचे व्यसन सोडण्यास मदत होईल, असे गुडका - अनंतवेद रिसर्च लॅब, पुणे येथील डॉ. राजस नित्सुरे यांनी ‘द इंजियन एक्स्प्रेस’ला सांगितले. या गोष्टी ठेवा लक्षात मुंबईतील ज्येष्ठ चिकित्सक आणि क्रिटिकल केअर स्पेशालिस्ट डॉ. रूही पीरजादा यांनी सांगितले की, हर्बलचा पर्याय कॅन्सरसारखे आजार देणाऱ्या गुटखा आणि पान मसालापेक्षा सुरक्षित आहेत, परंतु त्यांनी सावधगिरीने सांगितले की, कोणताही पान मसाला सुरक्षित नाही, जरी तो तंबाखूसह किंवा त्याशिवाय असला तरीही. हर्बल पान मसाल्यांमध्ये तंबाखू किंवा निकोटीन नसले तरीही त्यात जास्त प्रमाणात चुना, सुपारी आणि इतर हानिकारक घटक असतात, ज्यामुळे हिरड्यांचे आजार, दात किडणे आणि संभाव्य तोंडाचा कर्करोग यांसारख्या मौखिक आरोग्याच्या समस्या उद्भवू शकतात, असे कार्यात्मक औषधतज्ज्ञ शिवानी बाजवा यांनी सांगितले.त्यांनी असेही सांगितले की, काही हर्बल घटकांचे दुष्परिणाम ते जास्त प्रमाणात घेतल्यास होऊ शकतात, याच्या दीर्घकालीन वापरामुळे लोक त्यावर अवलंबून राहू शकतात. गुटखा आणि तंबाखूचे व्यसनाधीन स्वरूप केवळ निकोटीनमुळे नाही तर लोकांच्या मनोवैज्ञानिक कारणांवरसुद्धा आधारित आहे. तसेच हर्बल पान मसाल्यांची निवड केल्याने अंतर्निहित व्यसन आणि वर्तणुकीच्या पैलूंवर लक्ष केंद्रित केले जाऊ शकत नाही. डिक्सा म्हणाले की, ज्यांना पान मसाल्याचे व्यसन आहे, त्यांनाच हर्बल पर्याय वापरण्याचा सल्ला देतात. पण, याच्या अतिसेवनाचा सल्ला दिला जात नाही. इतर पर्यायदेखील फायदेशीर तुमच्या आरोग्यासाठी उत्तम पर्याय म्हणजे तुम्ही तंबाखू, गुटखा खाणं पूर्णपणे सोडणे, असे बाजवा यांनी सांगितले. सुरक्षित पर्याय तुम्ही तंबाखू आणि गुटख्याला सुरक्षित पर्याय शोधत असाल, तर खालील पर्याय निवडा बियाणे आणि काजू तुम्हाला सतत तंबाखू, गुटखा चघळण्याची सवय असेल तर तुम्ही सूर्यफुलाच्या बिया, भोपळ्याच्या बिया किंवा अगदी भाजलेले चणेदेखील खाऊ शकता.

# महाराष्ट्रात डेंग्यूचे रुग्ण वाढले! खरंच डेंग्यूमुळे मेंदूवर गंभीर परिणाम होतो? वाचा, तज्ज्ञ काय सांगतात..



कर्नाटक, तेलंगणा, आंध्र प्रदेश, ओडिशा, दिल्ली आणि महाराष्ट्रातील अनेक शहरांमध्ये डेंग्यूची प्रकरणे दिवसेंदिवस वाढताना दिसत आहे. त्यामुळे सगळीकडे डेंग्यूविषयी जगजागृती करून आरोग्याची योग्य ती काळजी घेण्यास सांगितले जात आहे.

डेंग्यूची प्रमुख लक्षणे ताप, अंगदुखी आणि थकवा आहे; पण तज्ज्ञांच्या मते आता डेंग्यूमुळे मेंदू आणि मज्जासंस्थेवर गंभीर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे यावर वेळीच उपचार घेणे आवश्यक आहे, कारण मेंदूशी संबंधित दीर्घकाळ आजार धोकादायक ठरू शकतात. डेंग्यूचा मेंदूवर कसा परिणाम होतो? त्याची लक्षणे कोणती व यावर कोणते उपचार घ्यावेत? या विषयी द इंडियन एक्स्प्रेसनी तज्ज्ञांच्या हवाल्याने सविस्तर माहिती सांगितली आहे.डेंग्यूचा मेंदूवर कसा परिणाम होतो? जनरल मेडिसिन व फिजिशियन डॉ. पलेती शिवा कार्तिक रेड्डी सांगतात, ताप, अंगदुखी या डेंग्यूच्या लक्षणांपलीकडे डेंग्यूचा परिणाम मेंदूवरसुद्धा होतो. डेंग्यूचा व्हायरस न्यूरोट्रॉपिक आहे, म्हणजेच त्याचा थेट संबंध मज्जासंस्थेशी आहे.

डेंग्यूचा व्हायरस जेव्हा मेंदूच्या आत जातो, तेव्हा काय घडते? हा व्हायरस जेव्हा मेंदूमध्ये शिरतो, तेव्हा मेंदूतील पेशी खराब होतात, ज्यामुळे मेंदूचे कार्य बिघडते. जेव्हा व्हायरस मेंदूमध्ये शिरतो तेव्हा शरीर रोगप्रतिकारशक्तीचा वापर करतो, त्यामुळे मेंदू आणि पाठीच्या कणामध्ये त्रास जाणवतो आणि तेथील टिश्यू खराब होतात. अनेक प्रकरणांमध्ये डेंग्यूमुळे थ्रोम्बोसाइटोपेनिया होऊ शकतो. थ्रोम्बोसाइटोपेनिया म्हणजेच शरीरातील रक्ताच्या पेशी कमी होतात आणि मेंदूमधून रक्तस्त्राव होण्याचा धोका वाढतो. डेंग्यूच्या प्रकरणांमध्ये मेंदूशी संबंधित समस्या ही एक प्रमुख चिंता आहे. डॉ. रेड्डी सांगतात, ही सर्व निरीक्षणे वैज्ञानिक संशोधनातून समोर आली आहेत, जे डेंग्यूचा थेट संबंध मेंदूवर होत असल्याचे सांगतात. तसेच जागरूकता पसरविणे आणि सतर्क राहण्याचा सल्लासुद्धा डॉ. रेड्डी देतात.डेंग्यूचा जर मेंदूच्या आरोग्यावर परिणाम होत असेल तर सुरुवातीची लक्षणे खालीलप्रमाणे दिसून येतात. या दरम्यान सतत हृदयाची धडधड वाढणे, मान दुखणे अशी लक्षणे दिसून येतात. तीव्र डोकेदुखी दिसून येते. या दरम्यान रुग्णाची दिशाभूल होऊ शकते. त्यांना एखाद्या गोष्टीवर लक्ष केंद्रित करणे कठीण जाते. त्यांची मानसिक स्थिती सतत बदलू शकते. स्नायूंमध्ये अनियंत्रित हालचाली जाणवू शकतात. या लोकांना अशक्तपणा जाणवू शकतो. नीट व स्पष्ट न दिसणे हे लक्षणसुद्धा दिसू शकते. उपाय आणि उपचार

डेंग्यूचा प्रसार रोखणे, हा यावरील सर्वात महत्त्वाचा उपाय आहे. त्यासाठी खालील गोष्टी करा. डासांवर नियंत्रण : तुम्ही ज्या ठिकाणी राहता जसे की घर, कार्यालये तिथे डासांवर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करा. डासांची संख्या कमी करण्यासाठी फवारणी आणि डासांपासून वाचण्यासाठी जाळी आणि इत्यादी गोष्टी वापराव्यात. लसीकरण : डेंग्यूची लस हा एक प्रभावी उपाय आहे. काही देशांमध्ये डेंग्यूची लस उपलब्ध आहे, यामुळे हा गंभीर आजार टाळता येतो. डॉ. रेड्डी सांगतात, ज्यांना डेंग्यूची लक्षणे दिसून आली, त्यांनी त्वरित डॉक्टरांकडे जाऊन डेंग्यूची चाचणी करणे आवश्यक आहे आणि काळजी घेणे महत्त्वाचे आहे. डेंग्यूसाठी कोणत्याही प्रकारचे अँटीव्हायरल उपचार नाहीत, पण ताप आणि अंगदुखी यांसारखी लक्षणे ओळखून त्यावर उपचार घ्यावे. डेंग्यूच्या गंभीर प्रकरणांमध्ये डॉक्टरांशी संपर्क साधून लगेच उपचार घेणे सुरू करावे.

# विलास सहकारी साखर कारखान्यास साखर आयुक्तालय,पुणेचे संचालक यशवंत गिरी यांची सदिच्छा भेट



लातूर / प्रतिनिधी :- यशवंत गिरी, संचालक (अर्थ), साखर आयुक्तालय, पुणे यांनी विलास सहकारी साखर कारखान्यास दिनांक १२ जुलै रोजी सदिच्छा भेट दिली. सदरील प्रसंगी कारखान्याच्या वतीने व्हा. चेअरमन रविंद काळे यांनी त्यांचे स्वागत केले. या भेटीमध्ये त्यांनी कारखान्याच्या कामकाजाचा आणि कारखान्याची आर्थिक स्थितीचा बारकाईने आढावा घेऊन समाधान व्यक्त केले. शासकीय देणी ची मुदतपूर्व परतफेड, एफ.आर.पी.चे संपूर्ण पेमेंट, कर्मचारी देणी थकीत नाहीत व सर्व कर्जाची वेळेत परतफेड तसेच मांजरा परीवारातील व्यवस्थापन व प्रशासनाने ऊस उत्पादकता वाढवणे, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, शेतकऱ्यांसाठी प्रशिक्षण, कर्मचारी आणि शेतकऱ्यांचे कल्याण व्यवस्थापनाने केलेल्या उत्तम आर्थिक नियोजनाचे आणि कल्याणकारी निर्णयांचे त्यांनी कौतुक केले. विलास सहकारी साखर कारखान्याने ऊभारणी पासून सर्वच हंगाम यशस्वीपणे पारपाडून सभासद, ऊसउत्पादक शेतकरी यांच्या हिताचे काम केले आहे. विलास कारखान्यासह मांजरा परीवारातील सर्व कारखान्यांची कामगिरी, आर्थिक नियोजन, सभासद - कर्मचारी योजना, प्रशासकीय कामकाज, व्यवस्थापकीय धोरण सहकार आणि साखर उदयोगासाठी अनुकरणीय असल्याचे साखर आयुक्तालय, पुणेचे संचालक यशवंत गिरी यांनी म्हटले आहे. कारखान्याच्या वतीने ऊस उत्पादकता वाढवणेसाठी कारखान्याने ऊस विकास, एकरी ऊसाची उत्पादकता, पाणी व्यवस्थापन आणि ऊस तोडणी यांत्रिकीकरण यांमध्ये लक्षणीय कामगिरी केली आहे. तसेच आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन कारखान्याने ठिबक सिंचन, माती परीक्षण, पथदर्शक ऊस लागवड, सुधारीत वाणांचा वापर यांसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला आहे. आधुनीक ऊसशेतीसाठी शेतकऱ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी कारखान्याने कृषी विभागातील कर्मचारी आणि ऊस उत्पादक शेतकऱ्यांना नियमितपणे प्रशिक्षण दिले आहे. कर्मचारी आणि शेतकऱ्यांचे कल्याण करणाऱ्या विविध योजना राबविल्या त्यांचे कौतूक याप्रसंगी संचालक (अर्थ), साखर आयुक्तालय, पुणेचे यशवंत गिरी, यांनी केले. सहकारमहर्षि दिलीपरावजी देशमुख, माजी मंत्री, आमदार कारखान्याचे संस्थापक चेअरमन अमित विलासराव देशमुख, चेअरमन वैशाली विलासराव देशमुख, आमदार धिरज विलासराव देशमुख आणि संचालक मंडळाने ऊस लागवड आणि ऊस तोडणीसाठी ऊसशेती यांत्रीकीकरण योजना राबवली. विशेषत: ऊसतोडणी कामगाराची कमतरता दूर करण्यासाठी हार्वेस्टरचा मोठया प्रमाणात ऊसतोडणीसाठी केलेला वापराची योजना अनुकरणीय असल्याचे गौरोवोद्गार काढले. यावेळी कारखान्याचे व्हा.चेअरमन रविंद्र काळे व कार्यकारी संचालक संजीव देसाई खातेप्रमुख, विभागप्रमुख व कामगार उपस्थित होते.

# पिपल्स एज्युकेशन सोसायटीच्या ७९ व्या वर्धापनदिनानिमित्त ५५ वी वैचारिक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संपन्न.

छत्रपती संभाजी नगर /प्रतिनिधी :- आपण सर्वांना ज्ञात आहेच की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ८ जुलै १९४५ ला शैक्षणिक क्षेत्रातील एक पाऊल पुढे टाकताना दि पिपल्स एज्युकेशन सोसायटी, मुंबई, ची स्थापना केली होती. त्या निमित्ताने दि पिपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना करण्यामागील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा प्रेरणादायी उद्देश : काल, आज आणि उद्या. या विषयावर ७९ व्या वर्धापनदिनानिमित्त फुले, शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल व दि आल इंडिया नाग असोसिएशन ( आईना) च्या संयुक्त विद्यमाने ५५ व्या वैचारिक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळेचे ७ जुलै २०२४ ला आयोजन करण्यात आले होते.



या प्रसंगी उद्घाटनपर मार्गदर्शन करताना मिलिंद विज्ञान महाविद्यालयाचे माजी प्राचार्य व माझा मिलिंदनामा या पुस्तकाचे लेखक डॉ. बी. सी. घोबले उद्घाटनपर मार्गदर्शन करताना म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना त्या काळातच मिलिंद महाविद्यालयाची तीन मजली इमारत बांधायची होती अशी माहिती त्यांना डॉ. एम. एल. शहारे यांनी दिली होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मिलिंद महाविद्यालयाची कोनशिला १९५१ ला उभारली होती. तर १९५५ ला या महाविद्यालयास मिलिंद तर परिसरास नागसेनवन असे नांव देण्यांत आले होते. त्यास २००५ साली ५० वर्षे पूर्ण झाल्याने व त्याच वर्षी डॉ. बी. सी. घोबले यांची मिलिंद विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून नेमणूक झाल्याने या संधीचे सोने करण्यासाठी त्यांनी २००५ ला 'नामकरणाची गोल्डन ज्युबिली सेरेमनी' असल्याने शासनाकडे मिलिंद महाविद्यालयाच्या इमारतीचे नुतनीकरण, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्वप्नातील ग्रंथालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या वस्तूसाठी मेमोरियल हॉल, परिसर सुशोभीकरण व रंगमंदिर नुतनीकरणासाठी महाराष्ट्र शासनाकडे ६ कोटी ५५ लाख ५० हजाराचे प्रस्ताव सादर केले होते. त्यापैकी १ कोटी ९० लाख ३२ हजार रुपये महाराष्ट्र शासन अंतर्गत मराठवाडा विकास कार्यक्रमाचा एक भाग म्हणून मिलिंद महाविद्यालयाच्या नुतनीकरणासाठी मंजूर करण्यात आले होते. त्यापैकी २००८-०९ च्या काळात एक कोटी रुपये प्राप्त झाले. मात्र उर्वरित रक्कम मंजूर होऊन सुद्धा संस्थेतील अंतर्गत वादामुळे प्राप्त करून घेता आले नाही. याबद्दल त्यांनी खंत व्यक्त केली.

प्रमुख वक्ते औरंगाबाद येथील सुप्रसिद्ध विधिज्ञ एड. सतीश बोरकर म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ज्या उदात्त हेतूने पिपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली होती, तो उद्देश लयास जाण्याच्या मार्गावर आहे. २० डिसेंबर २००२ ला संस्थेत आयोजित केलेल्या आदरांजलीपर शोक सभेत अजेंड्यावर नसताना सुद्धा चार नवीन सदस्यांची म्हणजे डॉ. डी. जे. गांगुर्डे, न्यायमूर्ती बी. एच. वराळे, डॉ. गंगाधर पानतावणे व सेवानिवृत्त न्यायधीश नरेंद्र चपळगावकर यांची आमसभेत नेमणूक केल्याचे जाहीर करण्यात आले होते. तिथून वादग्रस्त प्रकरणाला सुरूवात झाली. पुढे संस्थेत मेंबर सेक्रेटरीचे आवश्यकता नसताना पद निर्माण केल्याने आगीत तेल ओतल्यासारखे झाले. तर २००९ च्या काळात मनोहर राजेश सेवलीकर या नावाने संस्थेला प्राप्त झालेल्या निनावी पत्राचे आधारे करण्यात आलेल्या चौकशीतून संस्थेला लाभदायक काही निष्पन्न झाले नाही, मात्र संस्थेत कार्यरत वरिष्ठामध्ये विषाची पेरणी होण्यास मदत झाली, त्यामुळे पुढे अनधिकृत गटबाजीचा उदय झाला. सध्या एस. पी. गायकवाड हे एकमेव कायदेशीर ट्रस्टी कार्यरत आहेत. मात्र त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या उद्देशाला तिलांजली दिल्याने प्रांतवाद, कुरघोडीचे स्वार्थी राजकारण फोफावले. त्यामुळे संस्थेत रोस्टर उपलब्ध नसल्याने नवीन पदभरती बंद झाली आहे. परिणामी शेकडो बेरोजगारांना संधीपासून अलिप्त राहावे लागल्याने विविध महाविद्यालयाचा दर्जा खालावत चालला परिणामी विद्यार्थी संख्या रोडावली ज्यामुळे संस्था डबघाईस आली आहे. ही दुरावस्था दूर करण्यासाठी संस्थेच्या उत्कर्षासाठी शासनाने प्रशासकाची नियुक्ती केल्यास सुधारणा घडवून आणल्या जाऊ शकतात.

कार्यशाळेचा अध्यक्षीय समारोप करताना फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे संचालक बी. बी. मेश्राम म्हणाले की, प्रथमतः मी त्या सर्व वर्तमान पत्राच्या संपादकासह टीमचे आभार व्यक्त करतो, ज्यांनी फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या बातम्यांना ठळक प्रसिद्धी दिली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आधुनिक भारताच्या निर्मितीसाठी आवश्यक विद्वान, चारित्र्यसंपन्न मनुष्यबळ निर्माण व्हावे, म्हणून पिपल्स एज्युकेशन सोसायटीची ८ जुलै १९४५ ला स्थापना केली होती. डॉ. बी. सी. घोबले लिखित माझा मिलिंदनामा ची कैफियत समजून घेतल्यावर चांगले काम करणाऱ्यांना सोबती, सहकारी सुद्धा कसे त्रास देतात? याची जाणीव होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी रानडे, गांधी व जिना या चर्चेत जागतिक तत्त्वज्ञ थायेर यांना उधृत करताना म्हटले की, प्रत्येक पंथात, पक्षात, संघटनेत, संस्थेत अशी वेळ येईल की त्यांचा विकास, वृद्धी थांबलेली असेल, त्यांच्या रक्तवाहिन्या सक्त झालेल्या असतील, त्यांचे युवक दृष्टीहीन झाल्याने ज्येष्ठांचे स्वप्न साकार न करता, भूतकाळात जीवन जगण्यास मजबूर होतील. तसेच बाबासाहेब पुढे असेही म्हणतात की, प्रत्येक समाजात, संस्थेत, संघटनेत, अधोगतीची वेळ येईल. तेव्हा त्या अधोगतीपासून बचाव करण्यासाठी जुने मार्ग, जुने विचार आणि जुन्या सवयी उपयोगी पडत नसतील तर त्यांचा त्याग केला पाहिजे. अन्यथा, आपणांस आपले अस्तित्व टिकवून ठेवता येणार नाही. विषय केवळ पिपल्स एज्युकेशन सोसायटी पुरता मर्यादित नाही तर बाबासाहेब आंबेडकरांच्या पश्चात, त्यांनी निर्माण केलेल्या व नंतरच्या काळात चळवळीच्या अनुषंगाने अनुयायांनी निर्माण केलेल्या पक्ष, संघटना, संस्थांची अशीच दुरावस्था आहे. नेतृत्वात निर्वात पोकळी निर्माण झाली आहे. म्हणून डॉ. बी. सी. घोबले यांनी जसा माझा मिलिंदनामा लिहिला तसा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया, समता सैनिक दल, दि बुद्धिष्ट सोसायटी ऑफ इंडिया व नंतर निर्माण झालेल्या बामसेफ, बसपा, पँथर, एम्बस इत्यादींच्या अनुषंगाने असे निरपेक्ष लिखाण होण्याची आवश्यकता आहे.

या कार्यशाळेला एड. व्ही. डी. रामटेके, प्रा. मंगला झिने, एड. सतीश बोरकर, डॉ. बी. सी. घोबले, हिरामण आहिरे, राहूल मेश्राम, इंजिनीअर बी. जी. म्हस्के, अरुण इंगळे, डॉ. रमेशचंद्र धनेगांवकर, एस. ओ. इंगळे, धनराज गोंडाणे, संघदीप रोडगे, गोविंद कांबळे, एड. आर. टी. खंदारे, इंजिनिअर राजेश गायकवाड, धनराज देशमुख, एड. प्रवीण जाधव, एस. ए. कानडे, ए. एस. सबरदर्डे, बी. बी. मेश्राम, इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते. प्रा. मंगला झिने यांनी सुत्रसंचालन केले तर एड. विलास रामटेके यांच्या आभार प्रदर्शनाने हर्षोल्हासात कार्यशाळेची सांगता झाली.

## आदिवासी नेते रामराजे आत्राम यांना खा. शरद पवार यांच्या हस्ते जीवन गौरव पुरस्कार



लातूर :- आदिवासी नेते साहित्यिक रामराजे आत्राम यांना भारतीय भटके-विमुक्त संशोधन संस्था व फुले शाहू आंबेडकर विचार पंचायत सातारा या संस्थे तर्फे सन २०२३-२४ मध्ये जीवन गौरव पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. याची हकीकत अशी की, रामराजे आत्राम हे स्वत: आदिवासी असून आदिवासींच्या समाजसेवे सोबतच त्यांनी गेल्या चाळीस-पंचेचाळीस वर्षांपासून भटके-विमुक्तांच्या उन्नतीसाठी उपराकार लक्ष्मण माने यांच्या सोबतीने सामाजिक कार्य केलेले आहे. त्यांचे कार्य व त्याग या गोष्टीमुळे संस्थेने विचार करून प्रतिष्ठेचा जीवन गौरव पुरस्कार खा.शरद पवार यांच्या हस्ते देऊन यथोचित गौरव करण्यात आला. यावेळी खा.शरद पवार यांनी रामराजे आत्राम यांच्याविषयी अभिमानास्पद गौरव उद्गार काढले. यावेळी ज्येष्ठ विचारवंत डॉ. नागोराव कुंभार यांना फुले-शाहू-आंबडेकर हा पुरस्कार देऊन आणि निलंगा येथील भटक्या-विमुक्ताचे ज्येष्ठ कार्यकर्ते तथा कत्तीकार साहित्यिक विलास माने यांना युवा साहित्यिक पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी माजी राज्यपाल श्रीनिवास पाटील हे होते. तर पद्मश्री लक्ष्मण माने, शशी माने, भाई शैलेंद्र माने, समता माने, नारायण जेवळीकर, मच्छिंद्र भोसले, सातारा जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस अध्यक्ष सुनील माने,इंजि. विनायक बगदुरे आदी उपस्थित होते.सदर पुरस्कार मिळाल्याबद्दल राष्ट्रवादी काँग्रेस राज्याध्यक्ष जयंत पाटील, खा.सुप्रिया सुळे, आ.जितेंद्र आव्हाड, रा.जि.काँ. श.प.चे जिल्हाध्यक्ष संजय शेट्टे, चंद्रशेखर कत्ते, प्रदेश सचिव बस्वराज पाटील नागराळकर,माधव गंगापुरे, निशांत वाघमारे, ॲड.सुरेश पाटील, प्रशांत घार, जिल्हा सरचिटणीस पुरूषोत्तम पाटील, बक्तावार बागवान, नारायण नागरगोजे, ,रशीद शेख, साहेबअली सौदागर आदीनी रामराजे आत्राम यांचे अभिनंदन केले आहे.

## महामार्ग राहू द्या; पण शक्तिपीठ जोडणाऱ्या रेल्वे तरी सुरू करा

### मागणी : मराठवाड्यात रेल्वेची अनास्था,

दोन रेल्वे सुरू केल्यास होईल गैरसोय दूर
माहूर येथील रेणुका माता आणि प्रभू दत्तात्रयाचे मंदिर, चंद्रपूर येथील महाकाली मातेचे दर्शन सोयीचे व्हावे यासाठी छत्रपती संभाजीनगर ते चंद्रपूर ही नवीन रेल्वे सुरू करावी. तसेच परळी वैजनाथ, माहूर रेणुका माता आणि नागपूर येथील दीक्षाभूमीला जोडणारी परळी वैजनाथ ते नागपूर रेल्वे गाडी सुरू करावी, या मार्गावर दोन रेल्वे गाड्या सुरू झाल्या तर भाविकांची गैरसोय दूर होईल सर्वसामान्य जनतेत अशी चर्चा चालू आहे.



किनवट/शेख शौकत :- शक्तिपीठ महामार्गाला विरोध होत असून, हा महामार्ग झाला नाही तरी चालेल; पण, राज्यातील शक्तिपीठ देवस्थानांना जोडणाऱ्या रेल्वे गाड्या तरी सुरू कराव्यात, अशी मागणी होत आहे. त्यातूनच छत्रपती संभाजीनगर ते चंद्रपूर आणि परळी वैजनाथ ते नागपूर या दोन रेल्वे गाड्या सुरु करण्याची मागणी पुढे येत आहे. आदिलाबाद नांदेड या मार्गावर मागील काही वर्षात एकही नवीन गाडी सुरू झाली नाही. याउलट काझीपेठ ते मुंबई मार्गे वणी, आदिलाबाद, किनवट, नांदेड ही साप्ताहिक रेल्वे बंद करण्यात आली. विदर्भ, तेलंगणा, मराठवाड्याला विदर्भ आणि तेलंगणाच्या सीमेवर मराठवाड्याच्या शेवटच्या टोकाला आदिलाबाद ते नांदेड मार्गावर सर्वाधिक उत्पन्न देणारे किनवट हे रेल्वेस्थानक आहे. असे असतानाही नव्या गाड्यांचा वाणवा आहे. परळी ते आदिलाबाद या डेमू गाडीची आसन व्यवस्था गैरसोयीची आहे. त्यामुळे प्रवाशांची मोठी गैरसोय होत आहे. जोडणारा हा मार्ग आहे. मात्र रेल्वेची अनास्था आणि लोकप्रतिनिधींची उदासीनता असल्याने या मार्गावर नवीन रेल्वे गाड्या धावत नाहीत. डेमूऐवजी चांगले कोचेस असलेली रेल्वे सोडावी, अशी प्रवाशांची दोन वर्षांपासूनची मागणी आहे. मात्र त्याकडेही रेल्वेचे दुर्लक्ष होत आहे.

### राज्यात सर्वदूर पाऊस पण 'या' चार जिल्ह्यांत पावसाची दांडी!

राज्यातील सर्वच जिल्ह्यांमध्ये पावसाने हजेरी लावली आहे. हवामान विभागाच्या अद्ययावत आकडेवारीनुसार चार जिल्हे वगळता सर्वच जिल्ह्यांमध्ये सरासरीपेक्षा जास्त पाऊस झाला आहे.चांगला पाऊस झाल्यामुळे शेतकऱ्यांना लागवडी आणि खरिपाच्या पेरण्या आवरून घेतल्या आहेत.दरम्यान, १५ जूननंतर मान्सूनच्या पावसामध्ये जवळपास १५ दिवस अनेक भागांत खंड पडल्याचं चित्र होतं.




इनरव्हील क्लब लातूर डिस्ट्रिक्ट ३१३ च्या वतीने मातोश्री वद्राश्रमात १०० प्लेट व २०० वाट्या, नमकीन खाऊ, आचार, बिस्किट वाटप करण्यात आले. यावेळी या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून आनंदजी अग्रोया, रोटरी क्लबचे माजी अध्यक्ष गोविंद कुंचमवार, इनरव्हील क्लबच्या अध्यक्ष सौ सारिका गांधी, सचिव अनुराधा अग्रवाल सदस्या कु. रेश्मा बोरा, सो: प्रीती अग्रोया , शिला यादव कु. ज्योती वर्मा, कु. अर्चना मालू, ज्योती मंत्री, कु. मुक्ता चिं तलवार कु. अनुराधा बेळंबे तसेच मीना कुचेरिया आणि मातोश्री वृद्धाश्रमातील आजी, आजोबा आदी उपस्थित होते

## 'लातूर हरितोत्सव'मध्ये सहभागी होवूया, पर्यावरण संवर्धनासाठी योगदान देवूया !

### १४ जुलै रोजी गंजगोलाई परिसरात आयोजन

लातूर :- जिल्ह्यातील हरित क्षेत्र वाढविण्यासाठी जिल्हा प्रशासनाच्यावतीन 'माझं लातूर, हरित लातूर' अभियान राबविण्यात येत आहे. या अंतर्गत रविवार, १४ जुलै २०२४ रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ५ दरम्यान 'लातूर हरितोत्सव- २०२४' या अभिनव उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. गंजगोलाई परिसरात होणाऱ्या या उपक्रमात एकाच ठिकाणी विविध प्रजातीच्या वृक्षांची रोपे सवलतीच्या दरात उपलब्ध करून देण्यासोबतच वृक्ष लागवड, वृक्ष संवर्धन याबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. या उपक्रमात खासगी रोपवाटिकांचे स्टॉल लावण्यात येणार असून यासाठी २८ अधिक खासगी रोपवाटिकांनी नोंदणी केली आहे. यासोबतच शासकीय रोपवाटिकांचे स्टॉलही याठिकाणी राहणार आहेत. या उपक्रमामुळे औषधी वनस्पती, शोभेची झाडे, परसबागेमध्ये लावण्यायोग्य झाडे, फळझाडे व फुलझाडांची रोपे, वृक्षारोपणासाठी आवश्यक सेंद्रिय खते, कुंड्या व इतर आवश्यक साहित्य सवलतीच्या दरात एकाच ठिकाणी उपलब्ध होणार आहे. लातूर जिल्ह्यात हरित क्षेत्राचे प्रमाण अतिशय कमी असल्याने जिल्ह्यात वृक्ष लागवड मोहीम राबविण्यात येत आहे. यामध्ये लोकांचा सहभाग वाढवून ग्रामीण, तसेच शहरी भागातही मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करण्याचा जिल्हा प्रशासनाचा प्रयत्न आहे. 'लातूर हरितोत्सव २०२४' या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या संकल्पनेतून आयोजित उपक्रमाच्या माध्यमातून लातूरकरांना विविध वृक्षांची माहिती देण्यासोबतच त्यांना एकाच ठिकाणी विविध प्रकारची रोपे सवलतीच्या दरात उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. त्यामुळे नागरिकांनी या उपक्रमात सहभागी होवून आपल्या लातूर जिल्ह्यातील हरित क्षेत्र वाढविण्यासाठी योगदान देण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. मिलेटस फूड स्टॉलवर चाखायला मिळणार विविध पदार्थांची चव पौष्टिक तृणधान्य अर्थात मिलेटस हे आरोग्यासाठी अतिशय उपयुक्त असून जिल्ह्यात मिलेटस लागवडीला प्रोत्साहन देण्यात येत आहे. या खाद्यपदार्थांचे फायदे लोकांना समजावेत आणि मिलेटसपासून बनणाऱ्या पदार्थांची चव चाखता यावी, यासाठी 'लातूर हरितोत्सव २०२४' उपक्रमात मिलेटसपासून तयार करण्यात येणाऱ्या विविध पदार्थांचे स्टॉल महिला बचतगटांच्या माध्यमातून उभारण्यात येणार आहेत.


## जाहिर प्रगटन

सुशिलाबाई शंकरराव वाघमारे व संतोष शंकरराव वाघमारे हे दोघे राहणार शंभो नगर यांनी दि. ११/७/२४ सर्वे नं. २३७/२ यापैकी २० चा पूर्वभाग लातूर शहर महानगरपालिके तला खुला प्लॉट म.न.पा नं. ठ आर २/२५/११/५/ ए ५/१७९३ लांबी उत्तरेस ५० फूट आणि रूंदी पूर्वेस २२ फूट एकुण (९०२.२ चौ मी) क्षेत्रफळ ११०० चौ. फूट आहे. या घर मिळकतीचे नोटीस ऑफ इंटी मेटन (NOI) गहाणखत २०२४ करून दिलेले असुन सदरील गहाण खताबद्दल कोणाशी काही आक्षेप असल्यास जाहीर तारखेपासून ०७ दिवसाच्या आत खालील व्यक्तीशी संपर्क करावे.

संपर्क
ॲड.गणेश कांबळे
सिद्धार्थ सोसायटी लातूर


PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE